मंगळवार, 28 जून 2022
⊙ किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 01 ⊙ अंक - 294
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● TUESDAY 28 JUNE 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-01 ● ISSUE-294 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5

# महाविकास आघाडीला 'सर्वोच्च' झटका

## नरहरी झिरवळ, अजय चौधरी यांना नोटीस, ११ जुलैला पुढील सुनावणी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात शिवसेनेत बंडखोर करणाऱ्या आमदारांच्या याचिकेची सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांच्यासह शिवसेनेचे प्रतोद सुनिल प्रभू, शिवसेना गटनेते अजय चौधरी यांना नोटीस बजावली आहे. तसेच त्यांना ५ दिवसांमध्ये आपली बाजू मांडणारे प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. न्यायालयाने या प्रकरणाच्या पुढील सुनावणीसाठी ११ जुलैची तारीख दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाने बंडखोर शिंदे गटाच्या याचिकेवर सुनावणी करताना विधीमंडळ, शिवसेनेचे प्रतोद आणि बंडखोर शिंदे गट अशा तिन्ही पक्षकारांना आपापले म्हणणे मांडण्यासाठी नोटीस दिली आहे. तसेच या याचिकेची पुढील सुनावणी ११ जुलैला निश्चित केली आहे. विशेष म्हणजे न्यायालयाने यावेळी महाराष्ट्र सरकारला ३९ आमदार, त्यांचे कुटुंबीय व मालमत्ता यांची हानी होणार नाही याची काळजी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.**

१२ जुलैपर्यंत बंडखोर आमदारांवर अपात्रतेसंदर्भातील कोणतीही कारवाई करु नये असा आदेश सुप्रीम कोर्टाने दिला आहे. महत्वाचे म्हणजे सुप्रीम कोर्टाने विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ, प्रतोद सुनील प्रभू आणि नव्याने नियुक्ती झालेले गटनेते अजय चौधरी यांना नोटीस पाठवली आहे. पाच दिवसात त्यांना प्रतिज्ञापत्र सादर करण्यास सांगण्यात आले आहे. ११ जुलैला यासंदर्भात पुढील सुनावणी होणार आहे. सुप्रीम कोर्टाला पुढील सुनावणीपर्यंत परिस्थिती जैसे थे हवी आहे. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून आम्ही निकाल देऊ असे कोर्टाने सांगितले आहे. आमदारांना १२ जुलैपर्यंत आपले म्हणणे मांडण्यासाठी वेळ दिली आहे. त्यामुळे १२ जुलैपर्यंत आमदारांना अपात्र ठरवता येणार नाही.

**उपाध्यक्षांना पदावरुन दूर करण्यासाठी ठोस कारण हवे**

केवळ अविश्वासाच्या या ठरावामुळे विशेष अधिवेशन बोलवण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. नियमांनुसार यासाठी परवानगी नाही. मुख्यमंत्र्यांवर अविश्वास दाखवण्यासाठी कोणतेही कारण देत नाही. पण अध्यक्षांचा संबंध येतो तेव्हा कलम १७९ नुसार ठोस कारण द्यावे लागेल. सदस्यांना फक्त विश्वास नाही असे सांगता येणार नाही असा युक्तिवाद शिवसेनेचे वकील देवदत्त कामत यांनी केला आहे.

**अविश्वासाची नोटीस वैध की अवैध?**

उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांची बाजू मांडणारे वकील धवन यांनी वैध मेल आयडीवरुन नोटीस आली नसल्याने अविश्वास प्रस्ताव फेटाळला असल्याचे सांगितले. ते म्हणाले की, नोंदणीकृत ईमेलवरून अविश्वास प्रस्ताव नोटीस पाठवण्यात आली नव्हती. विधिमंडळ कार्यालयात पाठविण्यात आली नाही. उपसभापती न्यायिक क्षमतेने काम करतात. जर कोणी नोंदणीकृत कार्यालयातून पत्र पाठवले नाही तर ते आपण कोण अशी विचारणा करु शकतात. हा मेल



वकील विशाल आचार्य यांनी पाठवला होता. यावर न्यायमूर्तींनी याबाबत आमदारांना विचारणा केली होती का? अशी विचारणा केली. त्यावर धवन यांनी प्रतिज्ञापत्र दाखल करण्याची तयारी दर्शवली आहे.

**उपाध्यक्षांना अज्ञात ईमेल आयडीवरुन पत्र मिळाल्याने त्यांनी प्रस्ताव फेटाळला**

अभिषेक मनू सिंघवी यांनी यावेळी सांगितले की, उपाध्यक्षांना अज्ञात ईमेल आयडीवरुन पत्र मिळाल्याने त्यांनी अविश्वास प्रस्ताव फेटाळला होता. हे पत्र म्हणजे प्रस्ताव नसल्याचे सांगत फेटाळला होता. २० तारखेला सर्व आमदार सूरतला गेले आणि २१ तारखेला त्यांनी अविश्वास प्रस्ताव मांडणारा मेल लिहिला असावा. २२ तारखेला अध्यक्षांना हा मेल मिळाला. यावेळी १४ दिवसांचा नियम पाळण्यात आला नाही असे सिंघवी यांनी यावेळी सांगितले.

**आमदार व त्यांच्या कुटुंबीयांच्या संरक्षणाची हमी**

आमच्या जीविताला व मालमत्तेला धोका आहे, अशी भीती याचिकाकर्त्यांनी वकिलांमार्फत व्यक्त केली. बंडखोर ३९ आमदार आणि त्यांचे कुटुंबीय व त्यांच्या मालमत्तांचे रक्षण करण्यासाठी राज्य सरकारने आवश्यक ती पावले उचलली असल्याची ग्वाही राज्य सरकारच्या वकिलांनी सुप्रीम कोर्टात दिली. ती सुप्रीम कोर्टाने आदेशात नोंदवून घेतली आहे.

### ११ जुलैपर्यंत कोणतीही कारवाई होणार नाही

११ जुलैपर्यंत आमदारांच्या अपात्रतेबाबत कोणतीही कारवाई केली जाणार नाही असे आश्वासन उपाध्यक्षांची बाजू मांडणारे वकील धवन यांनी सांगितले. यावर शिंदे गटाच्या वकिलांनी हे विधान रेकॉर्डवर घ्यावे अशी विनंती केली. सिंघवी यांनी यावर सांगितले की, सामान्यतः कोर्ट अध्यक्षांच्या वतीने केलेले विधान रेकॉर्ड करणार नाहीत. कारण ते त्यांच्या अधिकारात हस्तक्षेप करण्यासारखे आहे. शिवसेनेचे वकील कामत यांनी यावर कोणत्याही न्यायालयाने कधीही अपात्रतेच्या प्रक्रियेला स्थगिती दिली नाही, सभागृहाच्या कामकाजाला स्थगिती दिली जाईल असा युक्तिवाद केला. यावर उपाध्यक्षांचे अधिकार न्यायकक्षेच्या बाहेर आहेत हे सिद्ध करा असे सुप्रीम कोर्टाने सेनेच्या वकिलांना सांगितले. यानंतर कोर्टाने आमदारांना १२ जुलैपर्यंत वेळ वाढवून दिली आहे.

# अयोध्येत सापडले बेवारस अवस्थेत १८ हातबॉम्ब

आधुनिक केसरी न्यूज

**अयोध्या :** अयोध्येतील कॅन्ट परिसरात सोमवारी दुपारी १८ हातबॉम्ब सापडल्याने परिसरात खळबळ उडाली. एवढ्या मोठ्या प्रमाणात बेवारस हातबॉम्ब मिळाल्यानंतर सुरक्षा यंत्रणाही सतर्क झाल्या आहेत. लष्कराच्या अधिकाऱ्यांनी हे हातबॉम्ब ताब्यात घेत नष्ट केले आहेत. हातबॉम्ब सापडलेल्या परिसरात सुरक्षा यंत्रणा वाढवण्यात आली आहे. निर्मलीकुंड येथील रस्त्याच्या कडेला असलेल्या झुडपात हे हातबॉम्ब सापडल्याचे सांगण्यात येत आहे. हा परिसर लष्कराच्या फायरिंग रेंजपासून काही अंतरावर आहे. तेथे राहणाऱ्या काही लोकांना हे बॉम्ब झुडपात आढळून आल्यानंतर त्यांनी पोलिसांना याबाबत माहिती दिली. पोलिसांकडून माहिती मिळताच मिलिटरी इंटेलिजन्सचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी हातबॉम्ब आपल्या ताब्यात घेतले आहेत. यामध्ये फ्यूज किंवा पिन नसल्याचं सांगण्यात येत आहे.



**प्रशासन सतर्क**

फायरिंग रेंजपासून अडीच किलोमीटर अंतरावरील झुडपात हे हातबॉम्ब कसे पोहोचले? असा प्रश्न निर्माण होत आहे. निर्मलीकुंड हा निवासी भाग असून तो हाय अलर्ट परिसर आहे. अशा स्थितीत एवढ्या मोठ्या प्रमाणात हातबॉम्ब मिळाल्याच्या घटनेनंतर प्रशासन सतर्क झाले आहे.

# यशवंत सिन्हांचा अर्ज दाखल



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** राष्ट्रपतीपदाचे विरोधी पक्षाचे उमेदवार यशवंत सिन्हा यांनी आज संसद भवनात अर्ज दाखल केला. यावेळी राष्ट्रवादीचे प्रमुख शरद पवार, काँग्रेस नेते राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गेंसह विरोधी पक्षांचे नेते उपस्थित होते. गेल्या आठवड्यातच एनडीएच्या उमेदवार द्रौपदी मुर्मू यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

भाजपा खासदार जयंत सिन्हा यांनी आपले वडील यशवंत सिन्हा यांना पाठिंबा दर्शवला नाही. यामुळे मी कोणत्याही धर्म संकटात नाही. माझा मुलगा त्याचा राजधर्म पाळेल आणि मी माझा राष्ट्रधर्म पाळेन, असे यशवंत सिन्हा यांनी म्हणले आहे. तसेच राष्ट्रपतीपदाची ही निवडणूक वैयक्तिक लढतीपेक्षा खूप महत्वाची असून सरकारच्या हुकूमशाही प्रवृत्तींचा विरोधात हे एक पाऊल आहे, असेही सिन्हा म्हणाले. येत्या १८ जुलैला राष्ट्रपती पदाच्या निवडणूकीसाठी मतदान घेण्यात येणार असून २१ जुलैला मतमोजणी होणार आहे. विरोधी पक्षासमोर भाजपाचे कडवे आव्हान आहे. लोकसभा, राज्यसभा आणि अनेक राज्यांच्या विधानसभांमध्ये भाजपाचे संख्याबळ पाहता विरोधी पक्षासाठी ही निवडणूक अवघड होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

## चर्चेतली बातमी

### नरेंद्र मोदी त्यांच्या मित्रांना 'दौलतवीर' तर तरुणांना 'अग्निवीर' बनवत आहेत : गांधी



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** देशभरातून प्रचंड विरोध होत असलेल्या केंद्र सरकारच्या अग्निपथ योजनेवर काँग्रेस सातत्याने टीका करत आहे. या योजनेविरोधात काँग्रेसने सोमवारी उत्तर प्रदेशातील सर्व विधानसभा मतदारसंघात सत्याग्रह केला. दरम्यान, काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि खासदार राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदींवर जोरदार हल्ला चढवला आहे.

केंद्राच्या अग्निपथ योजनेवरून पंतप्रधान मोदींवर हल्लाबोल करताना राहुल गांधी म्हणाले की, पंतप्रधान आपल्या मित्रांना 50 वर्षांसाठी देशातील विमानतळे देऊन 'दौलतवीर' बनवत आहेत आणि तरुणांना केवळ 4 वर्षांच्या करारावर 'अग्नीवीर' बनवले जात आहे. आज अग्निपथविरोधात काँग्रेस देशभरात सत्याग्रह करत आहे. जोपर्यंत तरुणांना न्याय मिळत नाही, तोपर्यंत हा सत्याग्रह थांबणार नाही, असे ट्विट राहुल यांनी केले.

केंद्र सरकारच्या अग्निपथ योजनेच्या निषेधार्थ सोमवारी उत्तर प्रदेशातील सर्व विधानसभा मतदारसंघात काँग्रेस कार्यकर्ते सत्याग्रह करत आहेत. प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते विकास श्रीवास्तव यांनी एका निवेदनात म्हटले आहे की, केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने सैन्यात भरतीसाठी आणलेल्या अन्यायकारक तुघलकी अग्निपथ योजनेला उत्तर प्रदेश काँग्रेस जोरदार विरोध करत आहे. प्रदेश काँग्रेसच्या प्रभारी प्रियांका गांधी यांच्या सूचनेनुसार राज्यातील सर्व विधानसभा मतदारसंघात पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि जिल्हा-शहर अध्यक्षांच्या नेतृत्वाखाली सोमवारी सकाळी 10 ते दुपारी 1 वाजेपर्यंत शांततेत सत्याग्रह करण्यात आला.

मेघालयाचे राज्यपाल सत्यपाल मलिक यांनी रविवारी 'अग्निपथ' योजनेला विरोध करत सरकारने या योजनेचा पुनर्विचार करावा, असे म्हटले आहे. मलिक म्हणाले की, जवान सहा महिने प्रशिक्षण घेतील, सहा महिन्यांची रजा आणि तीन वर्षांच्या सेवेनंतर घरी परतल्यावर त्याचे लग्नही होणार नाही.

# निवृत्तीनंतर अग्निवीरांना रेल्वेत रोजगाराची संधी

## रेल्वे मंत्र्यांकडून लवकरच मिळेल मंजुरी

आधुनिक केसरी न्यूज

नवी दिल्ली : केंद्र सरकारच्या नवीन अग्निपथ योजनेविरोधात देशभरात गदारोळ सुरू आहे. सैन्यात 4 वर्षे सेवा दिलेल्या अग्निवीरांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी सरकार विविध योजनांवर काम करत आहे. याअंतर्गत रेल्वे विभागात अग्निवीरांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याची योजना आखली जात आहे. याबाबत आराखडा तयार असून रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची मंजुरी मिळणे बाकी आहे.

लष्करातील भरतीसाठी सुरू करण्यात आलेल्या अग्निपथ योजनेला देशभरातून विरोध होत आहे. केवळ चार वर्षे सैन्यात सेवा केल्यानंतर अग्निवीरांना हाकलून देणे योग्य नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. यानंतर हे अग्निवीर बेरोजगार होतील आणि त्यांना कुठेही काम मिळणार नाही. याशिवाय लष्कराच्या क्षमतेवरही त्याचा परिणाम होणार आहे, असे अनेकांचे




म्हणणे आहे. दुसरीकडे, सरकारचे म्हणणे आहे की सैन्यातून आल्यानंतर स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी आणि नवीन रोजगार देण्यासाठी सरकार संपूर्ण मदत करेल.

स्थानकांवर स्टॉल्स मिळतील

मीडिया रिपोर्टनुसार, रेल्वेतील एका वरिष्ठ अधिकाऱ्याचे म्हणणे आहे की, अग्निवीरांना रेल्वेमध्ये रोजगार देण्यासाठी ब्लू प्रिंट तयार करण्यात आली आहे. अग्निवीरांना रोजगार देण्यासाठी "एक स्टेशन, एक उत्पादन" योजनेअंतर्गत स्टॉल्स दिले जातील. या योजनेअंतर्गत प्रत्येक शहरातील स्थानिक लोकप्रिय उत्पादनाची विक्री करण्यासाठी प्रत्येक प्लॅटफॉर्मवर किमान दोन कायमस्वरूपी स्टॉल उघडले जातील.

या उत्पादनांचा समावेश

या स्टॉल्सच्या मदतीने ते त्यांचा स्वयंरोजगार सुरू करू शकतील आणि सैन्यातून आल्यानंतर त्यांना बेरोजगार राहावे लागणार नाही. तसेच, यामुळे प्रत्येक प्रदेशातील स्थानिक उत्पादनांचे ब्रँडिंग होईल, असा रेल्वेचा विश्वास आहे. हस्तकला, कापड, हातमाग, पारंपारिक वस्त्रे, स्थानिक कृषी उत्पादने इत्यादींचा वन स्टेशन एक उत्पादन योजनेत समावेश करण्यात आला आहे.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

कारण खरोखरंच पाऊस किंवा मेघ हे त्याचं उदार रूप आहे. त्याचं देणं आहे. त्याची आभाळमाया आहे. म्हणून तो उदार.
पुढचं कडवं किती सुंदर आहे बघा. 'रंगाच्या रानात हरवले ते स्वप्नांचे पक्षी, निळ्या रेशमी पाण्यावरती थेंबबावरी नक्षी. ' पावसानं सगळं रान हिरवंगार झालं आहे. पाचूच्या रंगानं सृष्टी नटली आहे. माझी स्वप्नं जणू त्याच्याशी एकरूप झाली आहेत. पावसाचे थेंब जणू निळ्या रेशमी पाण्यावर नक्षी काढताहेत. पुढची ओळ तर खूप सुंदर. ' गतजन्मीची ओळख सांगत आला गंधित वारा ...' पावसाबरोबर जो आपला गंध घेऊन आला आहे तो आपल्यासोबत अनेक आठवणी घेऊन आला आहे. पुढच्या कडव्यातील शब्द रंग आपल्यासोबत कसे घेऊन आले आहेत ते बघा.

पाचूच्या हिरव्या माहेरी ऊन हळदीचे आले
माझ्या भाळावर थेंबाचे फुल पाखरू झाले
मातीच्या गंधाने भरला गगनाचा गाभारा..



# जादूगार पाऊस...

झाडांची हिरवी पाने म्हणजे जणू पाचूच . ऊन हळदीचे आले .. किती सुंदर शब्द ! कपाळावर पडलेल्या पावसाच्या थेंबांचे आनंदाने जणू फुलपाखरू झाले. आणि सगळीकडे ओल्या मातीचा गंध भरून राहिला आहे. आता शेवटच्या कडव्यातील सौंदर्य आपल्यापुढे ठेवून हा लेख संपवतो.

पानोपानी शुभशकुनांच्या कोमल ओल्या रेषा
अशा प्रीतीचा नाद अनाहत, शब्दावाचून भाषा
अंतर्यामी सूर गवसला, नाही आज किनारा...

आपल्या हातांवर जशा भाग्यरेषा असतात, तशाच पानोपानी उमटल्या आहेत. या रेषा शुभशकुनांच्या आहेत. येणारा भविष्यकाळ हा चांगला आहे, हेच जणू त्या सांगताहेत. ही निसर्ग, झाडे, सृष्टी आणिपावसाची प्रेमाची भाषा शब्दातीत आहे. शब्दांची गरज नाही. अशा वातावरणात जो आनंदाचा सूर अंतर्यामी गवसला आहे, त्याला सीमा नाही. असे हे पाऊसगाणे . आनंदाचे गाणे ! बहुप्रतिक्षेनंतर तो आपल्या दाराशी येऊन उभा आहे. त्याचे हर्षोल्लासात स्वागत करू या. त्याच्या आगमनाबरोबर तो शीतलता, समृद्धी आणि शुभशकुनांच्या कोमल ओल्या रेषा घेऊन येवो हीच त्याला प्रार्थना. आणि आपणही म्हणू या ' येरे घना , येरे घना न्हाऊ घाल माझ्या मना...'



# आनंदी पहाट

## पालकत्त्वाचे महत्त्व

आधुनिक केसरी

चांगल्या चारित्र्यामध्ये निष्ठा, प्रामाणिकपणा, धैर्य, सचोटी, शौर्य आणि चांगल्या वागणुकीला प्रोत्साहन देणारे इतर महत्त्वाचे गुण समाविष्ट असतात. चांगले चारित्र्य असलेली व्यक्ती योग्य गोष्ट करणे निवडते कारण त्याला किंवा तिला असे करण्याचा नैतिकदृष्ट्या त्यांना अधिकार आहे असे वाटते. सिद्धांताद्वारे वर्णन केलेले पाच व्यापक व्यक्तिमत्व गुणधर्म म्हणजे बहिर्मुखता, सहमतता, मोकळेपणा, प्रामाणिकपणा आणि न्यूरोटिसिझम हे होत.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आनंददायी व्यक्तिमत्व असलेला कर्मचारी असा असतो, कि जो कंपनीसाठी विविध समस्यांच्या उपायांमध्ये योगदान देतो. काय अन्यायकारक आहे, याबद्दल तक्रार करण्याऐवजी, तो किंवा ती प्रथम निर्णयामागील कारण समजून घेण्याचा प्रयत्न करतो आणि कंपनीच्या दोन्ही बाजूंना मध्यस्थी करण्याचा मार्ग शोधतो.
व्यक्तिमत्व विकास तुम्हाला समाजाकडून तसेच आजूबाजूच्या लोकांकडून ओळख आणि स्वीकृती मिळविण्यात मदत करतो. व्यक्तिमत्व विकास केवळ एखाद्या व्यक्तीच्या व्यावसायिकच नव्हे तर वैयक्तिक जीवनातही महत्त्वाची भूमिका बजावतो. हे एखाद्या व्यक्तीला शिस्तबद्ध, वक्तशीर आणि त्याच्या / तिच्या जीवनासाठी एक मालमत्ता / संपत्ती बनवते. लोक त्यांचे व्यक्तिमत्त्व बदलू शकत नाहीत, जे मोठ्या प्रमाणावर स्थिर आणि वारशाने मिळालेले आहे त्यामध्येच मशगुल झालेले असतात. परंतु सतत होणारा हस्तक्षेप आणि जीवनातील प्रमुख घटनांद्वारे व्यक्तिमत्त्व वैशिष्ट्ये बदलू शकतात. लहान मुलांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी पालकत्वामध्ये तीन आवश्यक घटक असतात. प्रथम, काळजी मुलांना हानीपासून वाचवते. काळजीमध्ये भावनिक तसेच शारीरिक आरोग्याचाही समावेश होतो. दुसरे म्हणजे, नियंत्रणामध्ये मुलांची आणि इतरांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी सीमा निश्चित करणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे क्रियाकलापांच्या सतत विस्तारित क्षेत्रांमध्ये समाविष्ट असते. मुलांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी पालकत्वाचे प्रमुख चार प्रकार दिसून येतात.



आधुनिक केसरी

## चराचरी नाचे | पांडुरंग ||

माझीया जीवाला | लागली रे आस ||
पंढरी निवास | विठ्ठलाचा ||१||

टाळ-मृदुंगाचा | नाद ऐकता मी ||
होतो अंतर्यामी | विठुमय ||२||

आषाढीच्या संगे | पावसाच्या धारा ||
पाऊलीचा | फेरा ब्रह्मानंद ||३||

ज्ञाना-तुका संगे | रमलो अभंगी ||
दिंडी मज सांगी | मोक्ष मार्ग ||४||

चैतन्याची वाट | रिंगण मुक्तिचे ||
चराचरी नाचे | पांडुरंग ||५||

आता सुखावलो | पाहता कळस ||
जन्माचा आळस | दूर झाला ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "नीतिशतक निरुपण"

आधुनिक केसरी


भग्नाशस्य करण्डपिण्डिततनोः
म्लानेन्द्रियस्य क्षुधा
कृत्वाखुर्विवरं स्वयं निपतितो
नक्तं मुखे भोगिनः ।
तृप्तस्तत्पिशितेन सत्वरमसौ
तेनैव यातः पथा
लोकाः पश्यत दैवमेव हि नृणाम्
वृद्धौ क्षये कारणम् ||



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**अर्थ :** हे सज्जनांनो, पहा - एक उंदीर रात्री पेटीला छेद करतो. त्यात ज्याने आपले शरीर आकुंचित केले आहे, जो निराश व भूकेने व्याकुळ आहे, अशा सापाचा ग्रास बनतो. सर्प त्याच्या मांसाने तृप्त होतो. त्याच बीळातून बाहेर येतो, ज्याला उंदराने मार्ग म्हणून तयार केले होते. माणसांच्या समृद्धी आणि अधोगतीचे भाग्यच कारण आहे. माणसांची प्रगती आणि त्याची अधोगती यांना केवळ कर्म नव्हे, तर त्याचे भाग्य देखील कारणीभूत आहे, असे प्रतिपादन भर्तृहरींनी येथे साप आणि उंदीर यांचे उदाहरण देऊन केले आहे.

# || दासबोध स्तवन ||



## ब्रह्मपावन निरूपण

आधुनिक केसरी

शुद्धमुळ असलेल्या निर्मळ। व गुणातीत परब्रम्हाला या विश्वाचा पत्ताही नसतो. पण सच्चिदानंद हा त्या ब्रम्हाचा स्वभाव आहे. त्यातील आनंदाला जे स्फुरण चढते जो विश्वाचा पसारा आपल्या सदैव सांभाळतो त्यालाच 'माया' म्हणतात. मायेमुळे परमात्मा ईश्वररूपाने माणसाच्या जवळ येतो. मायेमध्ये अनंत शक्ति वास करतात.




सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

रज,तम,सत्व हे तीन गुण आणि प्रुथ्वी,आप,तेज,वायु व आकाश ही पंचमहाभुतें मिळुन प्रक्रुती बनते. प्रक्रुती विश्वव्यापी असल्याने व्यक्त दशेस येताना तो सर्वव्यापी पणा सामान्य रूपाने कायम ठेवते. म्हणून जगातील यच्चयावत् वस्तुंना दोन अंगे असतात. एक सामान्य अंग व दुसरेविशेषाचे अंग.विशेषाला व्यक्ति किंवा रूप म्हणतात. तर सामान्याला जाति किंवा नाम म्हणतात.
खरे पहाता व्यक्ति दिसते रूप पण दिसते. ऊदा,ऊंच व्यक्ति,गोरा रंग,काळारंग इंद्रियांना दिसते,तर जाति किंवा नाम,अव्यक्त असते. बुद्धीला आकलन होते. अव्यक्तामधून व्यक्त रूप धरण करते. काही काळ तेथे वावरते. व पून्हां अव्यक्तामधे नाहिसे होतें. अशाप्रकारे तीन गुण आणि पाच महाभूते यांच्या चौकटीथ चालणाऱ्या प्रक्रुतीच्या या खेळाला द्रुष्य म्हणतात. परंतू हे अंतिम सत्य नाही ते प्रत्यक्ष दिसत असलें तरी ते भ्रमरूप आहे. ते बाजूला सारून परमात्मस्वरूपाचा अनुभव घ्यावा लागतो.

# गोरखनाथ : जीवनचरित्र

आधुनिक केसरी

भविष्यात तो एक असाधारण साधू होईल. ही आकाशवाणी ऐकून कामिकला फार आनंद झाला. त्या मुलाला पोटाशी धरून त्याचे लाड करीत कामिक त्याला आपल्या घरी घेऊन आला आणि त्याने त्या बालकाला बायकोच्या—शारदाच्या स्वाधीन केले. त्या बालकाला पाहून ती म्हणाली,"माझ्या स्वतःच्या पोटच्या मुलासारखाच या मुलाचा मी संभाळ करीन." एवढे म्हणून तिने आपली स्तनाग्रे त्याच्या तोंडात दिली आणि आश्चर्य म्हणजे दूध नसलेल्या त्या स्तनांतून दूधाच्या धारा वाहू लागल्या. माशाच्या पोटातून त्याने जन्म घेतला म्हणून त्या बालकाचे नांव त्यानी मच्छिन्द्र ठेवले. हळूहळू ते बालक पाच वर्षांचे झाले. कामिक आणि त्याची बायको मासे पकडायला जात त्यावेळेस मच्छिन्द्र सुध्दा आपल्या आईवडिलांबरोबर समुद्रावर जात असे. बाळ मच्छिन्द्र दिवसेंदिवस वाढू लागला. त्याच्या वाढत्या वयाबरोबर त्याच्या चेहऱ्यावर एक प्रकारचे तेज येऊ लागले. एके दिवशी त्याची आई आजारी पडली. तिला फार वेदना होत होत्या, म्हणून मच्छिन्द्र वडीलांबरोबर समुद्रकिनारी गेला. कामिकने त्याला समुद्रकिनाऱ्यावर एका टोपलीशेजारी



बसायला सांगून स्वतः माशांसाठी जाळे फेकण्यासाठी पाण्यात उतरला. त्या दिवशी सुदैवाने त्याला बरेस मासे सापडले. पकडलेले मासे त्याने टोपलीत टाकले. मच्छिन्द्रने माशांना टोपलीत उसळ्या मारतांना पाहिले आणि त्याला वाटले की पाण्यावाचून हे मासे कासावीस होत आहेत. त्याने लगेच एकेक मासा धरून समुद्रात टाकण्यास सुरुवात केली. आणि असे करीत थोड्याच वेळात त्याने ती टोपली रिकामी केली. कामिक जेव्हा मासे धरून दुसऱ्यांदा परत आला त्यावेळेस त्याला त्या टोपली रिकामी दिसली. त्याने आश्चर्याने मच्छिन्द्रला विचारले,"बाळा टोपलीतले मासे कुठे गेले?" मच्छिन्द्रने क्षणाचाही विलंब न करता सांगितले की मला त्यांचं तडफडणं सहन झालं नाही म्हणून त्यांना परत पाण्यात सोडलं हे ऐकल्यावर कामिक सुन्नपणे त्याला म्हणाला,"माझी दिवसभरची मेहनत तू फूकट घालविलीस.तू एवढासुध्दा विचार केला नाहीस कि आपण जर व्यापार केला नाही किंवा मासे विकले नाही तर खायचं काय? अशी चूक तू परत करता कामा नये. मी परत मासे फकडायला जात आहे. तोपर्यंत तू यांच्यावर लक्ष ठेव."
एवढं बोलून कामिक परत समुद्रात गेला. इकडे मच्छिंद्र ने विचार केला की, माझे वडिल अधाशी आहेत, हावरट आहेत. ते माशे धरणे थांबविणार नाहीत. कारण हे मासेच यांच्या उपजिविकेचं एकमेव साधन आहे. **(क्रमशः)**

# जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून शेतकऱ्यांची फसवणूक

## आम्ही तुम्हाला एमटी लोन देतो सांगून सहा महिन्यांपासून टाळाटाळ; बँकेविरुद्ध तत्काळ कारवाई करण्याची शेतकऱ्यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सावळदबारा :** सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथे जिल्हा मध्यवर्ती सहकार बँकेची शाखा असून सावळदबारा परिसरातील अशा बऱ्याच शेतकऱ्यांना या बँकेकडून जाणीवपूर्वक अडवणूक होत असून कर्ज देण्यास सुद्धा टाळाटाळ करित आहे. आता या बँकेकडून शेतकऱ्यांना सांगण्यात येत आहे की, तुम्हाला एमटीएन लोन देतो असे सांगून फक्त "भुल भुलय्या" सारखे शेतकऱ्यांना भुलवत असून कर्ज तर देतच नाही मात्र सारखी अडवणूक व फसवणूक करत असल्याचे चित्र सध्या सावळदबारा येथील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत पाहायला मिळत असून शेतकरी या बँकेच्या जाचाला कंटाळलेली असून जाणीवपूर्वक अडवणूक व फसवणूक होत असल्यामुळे त्या बँके विरुद्ध तात्काळ कारवाई करुन शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशी शेतकऱ्यांकडून मागणी होत आहे.

आता आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीचा बिगूल वाजणार असून वेगवेगळ्या पक्षांचे पुढारी, नेते आपल्या स्वार्थासाठी बँकेंशी संधान साधून शेतकऱ्यांना खोटी नाटी आश्वासने देत बँकेमार्फत आता शेतकऱ्यांना सांगण्यात येत आहे की, आम्ही तुम्हाला एमटी लोन देऊ असे सांगून वेळ काढून नेत




आहे. बँकेने आमच्या शेतकऱ्यांना पाईपलाईन किंवा एम.टी.लोन देऊ असे सांगून फाईल देण्यात आलेला होत्या. दोन महिन्यांत शेतकऱ्यांनी फाईलची पूर्तता करून त्या पुर्ण करून दिलेल्या आहेत. परंतू आज जून महिना संपत आला आहे. इकडे शेतकरी राजा दुबार पेरणीच्या संकटात सापडला आहे. शेतकरी कामधंदे सोडून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत कर्जासाठी हेलपाटे मारत आहे आणि लोन ऑफिसर मात्र उडवाउडवीची उत्तरे देत आहे. इकडून राज्याचे महसुल तथा ग्रामविकास राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांनी शेतकऱ्यांना तातडीने कर्ज मंजूर करून द्यावे असे आदेश बँकेना दिलेले असून सुद्धा जिल्हा मध्यवर्ती सहकार बँकेचे कर्मचारी मंत्र्याच्याच आदेशाला केराची टोपली दाखवत आहे. सोयगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना बँकेकडून जाणीवपूर्वक पीककर्ज देण्यास विलंब होत असल्याचा आरोप करीत शेतकरी करत आहे. तातडीने कर्ज उपलब्ध करून द्यावे, खरीप हंगामातील पेरणीसाठी शेतकरी आर्थिक अडचणीत असून कर्जासाठी बँकेत चकरा मारत आहे. मात्र कर्ज देण्यात जाणीवपूर्वक टाळाटाळ करण्यात येत आहे. यामुळे शेतकऱ्यांना सावकारांच्या दारे ठोठवावी लागत आहे, असे निवेदनात माजी सरपंच किसनराव सुर्यवंशी यांनी म्हटले आहे.

**शेजारीच भिंतीला भिंत असलेली महाराष्ट्र ग्रामीण बँक आहे. आतापर्यंत हजारो शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचा एजंट न लावता क्रॉंफलोनचे कर्ज मिळत आहे ते पण तात्काळ मंजूर करून शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात येत आहे. कोणत्याही प्रकारची शेतकऱ्यांची फसवणूक केली नाही. मात्र जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने खोटे आश्वासने देऊन शेतकऱ्यांना खर्चात टाकले आहे, असे निवेदन आता राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांच्याकडे देण्यात आले आहे.**

**अलकाबाई चव्हाण**
**शिवसेनेचे महिला शाखा अध्यक्ष, सावळदबारा**

**लोन ऑफिसर सुखदेव गवळे, राजेंद्र काळे व अमोल पाटील यांनी शेतकऱ्यांना एम.टी.लोनच्या फाईल करा म्हणून सांगितले होते. त्याप्रमाणे शेतकऱ्यांनी पुढील प्रमाणे कागदपत्रे जमा केले आहे. तीन बाँड, दोन गॅरेंटर व गॅरेंटरचे सिबिल, ईस्टमेंट, कर्जदारांचे सिबिल, जी.एस.टीचे कोटेशन, पाच कोरे चेक, रजिस्ट्रर ऑफिसचे व्हॅंल्यूशन, सातबारा, नमूना नं आठचा उतारा व चलन भरले अशा शेतकऱ्यांना आतापर्यंत चार पाच हजार रुपये खर्च आला आहे आणि लोन ऑफिसर शेतकऱ्यांना तारण करून मागत आहे आणि सुरवातीला तारण करावे लागेल असा कोणताही उल्लेख जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या फाईलवर नाही. तरी सुध्दा बँक अशाप्रकारे खोटे बोलून शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने फुसली आहे. शेतकरी तारण करून द्यायला तयार नाही कारण एकरी फक्त पन्नास हजार रुपये कर्ज आहे. प्रत्येक शेतकऱ्यांचा पाच पाच हजार रुपये फाईला खर्च झाला आहे हा खर्च आता कोण भरपाई करून देईल? अशा प्रश्न आता शेतकऱ्यांना पडला आहे. याकडे संबंधित जिल्हा मध्यवर्ती बँकेचे वरिष्ठ अधिकारी लक्ष घालतील का याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.**

**श्रीराम नामदेव महाजन,**
**कर्जदार शेतकरी, सावळदबारा**



# श्रीयश अभियांत्रिकीतर्फे बोकूडजळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** दि. १२ ते १९ जून २०२२ दरम्यन बोकूडजळगाव तालुका पैठण येथे श्रीयश अभियांत्रिकी महाविद्यालय व डॉ. बाबासाहेब आबेडकर टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी, लोणेरे याच्या संयुक्त विद्यमाने ५० विद्यार्थ्यांसह राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीराचे आयोजन केलेले होते. "नॉट मी बट यु" हे ब्रीदवाक्य लक्षात ठेऊन सामाजिक बांधिलकी म्हणून श्रीयश अभियांत्रिकी नेहमीच अग्रेसर राहिलेले आहे. या शिबिरामध्ये विविध उपक्रम राबवण्यात आलेले आहेत त्यामध्ये सर्व प्रथम जिल्हा परिषद शाळेची स्वच्छता करून शिबिराचे उदघाटन प्राचार्य डॉ. आर.एस. पवार यांनी केले व प्रमुख पाहुणे म्हणून गावचे सरपंच रामेश्वर लोखडे, प्रा.जयानंद शास्त्री, प्रा.अनिल रोकडे व राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा.दत्ता खाडे उपस्थित होते.

शिबिरामध्ये संपूर्ण गावाची स्वच्छता करण्यात आली. पावसाचे पाणी जमिनीत मुरवण्यासाठी वन विभाग्याच्या डोंगरावर १५० खड्डे खोदण्यात आले. संपूर्ण गावामध्ये वृक्षारोप करण्यात आले त्यामध्ये विशेषतः वड, पिंपळ, चिंच व निंब या रोपाचे रोपन करण्यात आले. त्यानंतर गावकऱ्यासोबत योगा करण्यात आला. योगासाठी योग गुरु म्हणून डॉ. उत्तम काळवणे हे लाभले होते. त्यांनी सकाळी सहा वाजता गावकऱ्यांसोबत विध्यार्थ्यांना योगाचे प्रक्षिक्षण दिले. तसेच रात्री प्रसिद्ध भारूडकार प्रा अनिल मगर यांचा भारुडाचा कार्यक्रम झाला त्यामध्ये त्यानी गावकऱ्याचे प्रबोधन केले व शिक्षनाचे महत्व पटवून सांगितले. शेवटी गंगाधर महाराज राऊत मठाधिपती बोकूडजळगाव यांचे प्रवचन झाले यामध्ये गंगाधर महाराजानी शिक्षण घेतानाचा अनुभव व शिक्षणाचे महत्व सांगत मुलांनी केलेल्या सामाजिक कार्याबद्दल महाविद्यालय व विद्यार्थ्यांचे आभार मानले. शिबिरामध्ये विद्यार्थ्यांकडून शिक्षण व पर्यावरणाबद्दलचे महत्व पटवून दिले, शिबीरा दरम्यान गावकरी मोठ्या संख्येने सहभागी होते.

शिबिराबद्दल श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष बसवराज मंगरूळे मुख्य कार्यकारी अधिकारी कर्नल जॉय डॅनियल व संचालक प्रभाकर म्हाशाळकर यांनी यशस्वी आयोजकाचे अभिनंदन केले. या सामाजिक शिबिराच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा.दत्ता खाडे, प्रा.पौर्णिमा मरावार, प्रा. उल्का मानकरें व प्रा.मालू हणुमथे तसेच विद्यार्थ्यांमधून उदय राठोड, अविनाश चव्हाण, अजय चव्हाण, जगदीश घुगे, कोमल राठोड, सभाजी शिंदे, श्रुती जगताप व आदींनी परिश्रम घेतले.

# मुलगी जन्माला आल्याने जंगी स्वागत करुन आनंदोत्सव साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**संदीप मानकर**

**औरंगाबाद :** सर्वांना आपल्या घरात वंशाचा दिवा पाहिजे म्हणून मातेच्या पोटात वाढणाऱ्या स्त्री अर्भकाला जन्माच्या आधीच लिंग चाचणी करुन गर्भपात केले जाते. म्हणजेच उमलणाऱ्या कळीला जग पाहण्याच्या अगोदरच कुस्करुन टाकले जाते असा प्रकार सर्वत्र घडतांना आपण नेहमीच पाहत असतो. परंतु या विषयाला खोडा घालत औरंगाबाद शहरातील मयूरपार्क या परिसरात राहणाऱ्या भालेराव परिवारात मुलीने जन्म घेतला ही आनंदाची बातमी कानावर पडताच या परिवाराने समाजाला एक अनोखा संदेश देत मुलीच्या जन्मानिमीत्त मोठया जल्लोषात वाजत-गाजत आनंदोत्सव साजरा केला व यांसोबत परिवाराच्या वतीने संपूर्ण परिसरात पेढे व मिठाईचे वाटप करण्यात आले.

सविस्तर वृत्त असे की, कोलठाण वाडी या छोट्याश्या खेडेगावांतून आपला उदरनिर्वाह भागविण्यासाठी शहरात आलेला भालेराव परिवार यांच्या परिवारातील सौ.प्रियंका गणेश भालेराव या मातेने मुलीला जन्म दिला ही बातमी मिळताक्षणी सर्वत्र रांगोळीची आरास काढत, व फुलांचे आच्छादन करीत अत्यंत मोठ्या उत्साहात हा आनंदोत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी नवजात मुलीचे आई-वडील सौ.प्रियंका गणेश भालेराव, मोठे काकू-काका सौ.रेखा सागर भालेराव, काकू-काका सौ. वर्षा रमेश भालेराव आदींसहित नातेवाईक मंडळी व बच्चेकंपनीची उपस्थिती होती.



# लळींग किल्ल्याच्या पायथ्याशी भगवान बुद्धांची मूर्ती व विहार बांधण्याची बौद्ध क्रांती मोर्चाची मागणी



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** लळींग किल्लाच्या पायथ्याशी भगवान बुध्दाची 288 मिटर उंचीची मुर्ती व विहाराचे बांधकाम करण्यात यावी सदर निवेदन जिल्हा अधिकारी यांना करण्यात आली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर धुळे येथे 31 जुलै 1937 ते जुन 1938 ला धुळे येथे कोर्टाच्या कामानिमीत्ताने आले होते. त्या दोन भेटी स्प्रतीप्रीत्यर्थ लळींग लाडोंर बंगला येथे दरवर्षी 31 जुलैला खान्देशसह महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश व संपुर्ण भारतातून हजारो लाखोंच्या संख्येने सर्व समाजाचे बांधव येथे बाबासाहेबांना वंदन करायला येत असतात. ज्या पध्दतीने धम्मचक्र प्रवर्तन दिवसाला नागपुर येथे व महापरिनिर्वान दिनाला चैत्यभूमी शिवाजी पार्क दादर येथे सर्व समाज जमतो त्याच पध्दतीचा व तेव्हडाच संख्येने येथेही वंदन करायला येत असतो. ऐरवी वर्षभर तेथे थंड हवामान नदी व डॅम असल्यामुळे जवळच्या मालेगाव, चाळीसगाव, साक्री, शिंदखेडा, शिरपुर तालुक्यातुन व नंदुरबार जिल्हातुन लोक पर्यटनासाठी येत असतात त्या कारणास्तव येथील वनविभागाच्या कुरणांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती वन परिसर असे नामकरण करण्यात आलेले आहे. तेथे एक मोठे पर्यटन स्थळ विकसीत होऊ शकते व त्याच परिसरात लळिंग येथे मुंबई आग्रा महामार्गालगत किल्ला आहे व किल्लाच्या पायथ्याशी किल्लाच्या उंचीला साजेशी 288 मिटर उंचीची भगवान बुध्दांची मुर्ती व बौध्द विहार बांधण्यात यावे ही विनती. 288 मिटर उंची याकरीता आहे की महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य संख्या 288 आहे.

भविष्यात हा स्टच्यु ऑफ फ्रिडम जेव्हा उभारला जाईल त्यावेळी ते जागतीक दर्जाचे पर्यटल स्थळ म्हणून विकसीत होईल यात तिळमात्र शंका नाही असे बौद्ध क्रांती मोर्चा चे अध्यक्ष राजदीप आगळे यांनी ह्या निवेदनात म्हटले आहे. या वेळी बौद्ध क्रांती मोर्चा संस्थापक राजदीप आगळे, एकलव्य सेनेचे राज साळवे व सामाजिक कार्यकर्ते श्रीकृष्ण बेडसे आदी उपस्थित होते.



# राणेंची ट्विटरबाजी

आधुनिक केसरी

सर्वोच्च न्यायालयामध्ये सुरु असणाऱ्या सुनावणीदरम्यान शिवसेनेचे बंडखोर नेते एकनाथ शिंदे आणि त्यांच्या समर्थक आमदारांनी आपण महाविकास आघाडीचा पाठिंबा काढून घेत असल्याचे न्यायालयाने सांगितले आहे. यामुळे आता महाविकास आघाडी सरकार अल्पमतात गेले असून राजकीय पेच निर्माण झाला आहे. सर्वोच्च न्यायालयामध्ये या प्रकरणावर सुनावणी सुरु असतानाच केंद्रीय मंत्री नारायण राणेंनी ट्विटरवरुन मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंचे पुत्र आणि राज्यातील कॅबिनेट मंत्री आदित्य ठाकरे यांच्यासबरोबरच शिवसेनेचे प्रवक्ते आणि खासदार संजय राऊत यांच्यावर खोचक शब्दांमध्ये टीका केली. विशेष म्हणजे काही महिन्यापूर्वी उद्धव ठाकरेंविरोधात केलेल्या वादग्रस्त वक्तव्यामुळे थेट अटकेपर्यंत प्रकरण गेल्याची आठवणही नारायण राणेंनी करुन दिली. नारायण राणे यांनी ट्विटरवरुन गुवहाटीमधील हॉटेलमध्ये राहत असणाऱ्या शिवसेनेच्या बंडखोर आमदारांबद्दल राऊत यांनी केलेल्या वक्तव्यावरुन शिवसेनेला लक्ष्य केले आहे. तसेच या ट्विटमध्ये त्यांनी युवराज असा उल्लेख करत आदित्य ठाकरेंनाही टोला लगावला आहे. शिवसेनेची सत्ता गेल्यात जमा. युवराजांनी धमक्या देणे बंद करावे. अंगावरचे मच्छर मारता येत नाहीत अशांच्या, गुवाहाटीतील हॉटेलमधून बंडखोरांची प्रेत बाहेर पडतील, अशा वल्गनांवर कोण विश्वास ठेवेल?, असा टोला राणेंनी लगावला आहे. तसेच या ट्विटच्या शेवटी त्यांनी काही महिन्यांपूर्वी त्यांच्याविरोधात मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंबद्दल केलेल्या वक्तव्यावरुन झालेल्या अटकेच्या कारवाईचा अप्रत्यक्षपणे संदर्भ देत, अशा धमक्या देणे हा गुन्हा होत नाही का? असाही प्रश्न विचारला. मुख्यमंत्र्यासंदर्भात राणेंनी केलेले एक वक्तव्य गुन्हा असल्याचा ठपका ठेवत त्यांच्याविरोधात मागील वर्षी ऑगस्ट महिन्यात अटकेची कारवाई करण्यात आलेली. राणे यांनी आपल्या ट्विटमध्ये राऊत यांच्या वक्तव्याचा संदर्भ दिला. रविवारी म्हणजेच २६ जून २०२२ रोजी सकाळी शिवसेनेच्या मेळाव्यात बोलताना शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांची जीभ घसरली. गुवाहाटीहून ४० आमदारांचे मृतदेह मुंबईत येतील व त्यांचे शवविच्छेदन होईल, असे विधान संजय राऊत यांनी केले. त्यावरून मोठा वाद सुरू झाला. त्यावर संध्याकाळी राऊत यांनी सारवासारव केली. आमदारांनी आत्मा विकल्याने जे उरले ते केवळ त्यांचे जिवंत शरीर मृतदेहासारखेच आहे. आता त्यांचे विधानभवनात विच्छेदन होईल, असा माझ्या विधानाचा अर्थ असल्याचा खुलासा राऊत यांनी केला. स्वातंत्र्यदिनाच्या मुख्यमंत्र्यांच्या भाषणासंदर्भात केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी वादग्रस्त शब्दात टीका केली होती. राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते मंत्रालयातील ध्वजारोहण पार पडल्यानंतर त्यांनी उपस्थितांसमोर भाषण केले. त्यावेळी त्यांनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीलाच अमृत महोत्सवी स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. पण त्यानंतर भाषणाच्या दरम्यान मात्र त्यांचा गोंधळ उडाला, असे राणे म्हणाले होते. हा स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव की हिरकमहोत्सव? यावरून मुख्यमंत्री गोंधळलेले दिसले असे ते म्हणाले होते. बाजूला एखादा सेक्रेटरी ठेव आणि विचारून बोल. त्या दिवशी नाही का? किती वर्षे झाली देशाला स्वातंत्र्य मिळून, अरे हिरक महोत्सव काय? मी असतो तर कानाखालीच चढवली असते, असे वादग्रस्त वक्तव्य नारायण राणे यांनी केले होते. या प्रकरणामध्ये राणेंविरोधात ठाकरे सरकारने थेट अटकेची कारवाई केली होती. हे प्रकरण त्यावेळी चांगलेच तापले होते.

# मूल्यशिक्षण व व्यवस्थापन शिकावं तर वारीतच



उद्धवबापू फड
संपर्क क्र. : 9765588800

आधुनिक केसरी

**वारी हे रसायन वेगळेच आहे. वारीची पहिली सार्वजनिक जागतिक पातळीवरील नोंद B.B.C ने घेतली. त्यानंतर 'पंढरीची वारी' हा जागतिक आकर्षणाचा विषय ठरला. आज अनेक परदेशी वारकरी पण वारीत सामील होतात. एकानेव आईनाकोवा या जपानी महिला वारकरी गेली ३५ वर्षे वारी करीत आहेत. नव्हे तो एक अभ्यासाचा विषय झाला आहेमहाराष्ट्रातला अलौकिक असा हा पंढरीच्या वारीचा सोहळा जगाच्या कौतुकाचा, अभ्यासाचा आणि कुतूहलाचा विषय बनलेला आहे. त्यामुळे वारी अनुभवण्यासाठी दर वर्षी भारतासह परदेशी पाहुणे येत असतात.**

ऊन, वारा, पावसाची तमा न बाळगता अखंडपणे लाखो भाविक अनेक शतकांपासून या सोहळ्यात सहभागी होतात. वारी म्हणजे देहू-आळंदीपासून पंढरपुरापर्यंत विठ्ठलनामसंकीर्तन करीत करीत २८० कि.मी.चा केलेला पायी प्रवास. याला सातशे वर्षांची अगाध परंपरा आहे. ज्ञानेश्वरांच्या आई-वडिलांनी तेराव्या शतकात वारी केल्याचा उल्लेख आढळतो. निवृत्तीनाथांनी आपल्या भावंडांसह वारी केल्याचा उल्लेख आढळतो. जगद्‌गुरू तुकाराम महाराजही पंढरीची वारी करत असत. पुढे त्यांचे चिरंजीव नारायण यांनी ती परंपरा चालू ठेवली. त्याकाळी म्हणजेच १६८० ते १८३० च्या दरम्यान वारी देहू व आळंदीहून एकत्रितपणे जात असे. ही पालखी ज्ञानदेव व तुकोबा यांच्या पादुकांसह पायी, बैलगाडी, हत्ती-घोडे, अंबारी अशा भव्य विलोभनीय लव्याजम्यासह मोठया दिमाखात जाई. १८६० नंतर काही कौटुंबिक कारणांमुळे देहू व आळंदीच्या पालख्या विभक्तपणे जाऊ लागल्या. हत्ती घोडे यांचा लवाजमा कमी कमी होऊ लागला; अश्या वेळी "हैबतबाबा" यांनी पालख्यांना पुन्हा एकदा शिस्त व वळण लावले. शितोळे सरकार यांच्यातर्फे वारीच्या व्यवस्थेची व घोडयांची व्यवस्था केली गेली ती परंपरा आजपर्यंत चालू आहे. वारीच्या रिंगणातील दोन घोडे हे शितोळे सरकारांच्या घराण्याकडून आजही येतात. वारीतील आजची शिस्त, भक्तीभाव, एकरूपता, निश्चलता, सौहार्द, समर्पण आणि शरणागती याचे सर्व श्रेय हैबतबाबांना जाते म्हणून आजही आळंदीस देवळात त्यांची पायरी आहे. प्रथम त्यांना नमस्कार होतो आणि मग ज्ञानोबांना.

गेल्या काही वर्षांत डॉक्टर्स, इंजिनीअर्स, आय. टी. क्षेत्रातील मंडळी, कॉर्पोरेट क्षेत्रातले आणि सरकारी अधिकारी तसेच उच्चशिक्षितांचा वारीतला सहभाग वाढतो आहे. उत्कृष्ट व्यवस्थापनाचा उत्तम वस्तुपाठ म्हणून वारीकडे पाहायला हवे. अगदी शिस्तीने पन्नास माणसे एकत्र निघाली तरी गोंधळ होतो. मग ही हजारो माणसे एवढ्या शिस्तीत कसा काय प्रवास करतात? 'विठ्ठल' नावाचे ध्येय कसे गाठतात? यासाठी वारीतले व्यवस्थापन जाणकारांनी अभ्यासले पाहिजे. वारीतल्या यशस्वी व्यवस्थापनाचे गमक खालील सूत्रात सापडते. स्वंशिस्त, सौहार्द, सहचर्य, सहकार्य, समर्पण आणि शरणागती या षटसुत्रींवर हे सर्व चालते व ती कुणीही कुणावरही लादत नाही.

**स्वयंस्फूर्त सहभाग :** जाहीरात नाही, विनंती नाही, कोणतेही निमंत्रण न देता, एसएमएस न करता, मेल न पाठवता, मिस् कॉल न देता, व्हॉटस्ॲपवर चॅट न करता लाखो वारकरी एकाच वेळी एकाच ठिकाणी जमा होतात. आळंदी ते पंढरपूर आणि देहू ते पंढरपूर हा प्रवास अतिशय शिस्तबद्धरीतीने करतात. हा त्यांचा सहभाग स्वयंस्फूर्त असतो. त्यामुळे उत्साहात ते ध्येय गाठण्यासाठी वाटचाल करीत असतात.

**अचूक नियोजन :** दिंडीचा एक कार्यक्रम निश्चित केलेला असतो. पालखी निघण्यापूर्वी जेव्हा माउलींच्या पादुकांची



पूजा केली जाते, तेव्हा पालखी निघण्याची वेळ झाली आहे हे समजण्यासाठी पाच-दहा मिनिटांच्या अंतराने तीन वेळा कर्णा होतो. पहिला कर्णा झाला की वारकारी निघण्याच्या तयारीला लागतात. सामानाची आवराआवर होते. दुसरा कर्णा होतो, तेव्हा सर्वजण पालखी सोहळ्यात सहभागी होतात. तिसरा कर्णा झाला की, पालखी निघते. काही अंतर चालले, की विसावा घेतला जातो. अर्ध्या तासाच्या विश्रांतीनंतर पुन्हा वाटचाल सुरू होते. दुपारच्या विश्रांतीसाठी पालखी थांबते तेव्हा तिथेच भोजनाची व्यवस्था केलेली असते. भोजनानंतर विश्रांती घेऊन वारी चालून पुन्हा विसाव्यासाठी थांबते आणि सूर्यास्ताच्या सुमाराला मुक्कामाच्या ठिकाणी पोहोचते. हे नियोजन इतके अचूक असते की व्यवस्थापन शास्त्राच्या जाणकारांनी तोंडात बोट घालावे.

**स्वयंशिस्त :** एरवी सार्वजनिक आणि नागरी जीवनात अभावानेच दिसणारी स्वयंशिस्त वारीत आपला वेगळा ठसा उमटवून जाते. नियोजनातल्या क्रमाची घडी कुठेही विस्कटताना दिसत नाही. शे-पाचशे किंवा हजार लोकांची व्यवस्था करणे तुलनेने सोपे असते. पण जिथे लक्षावधी लोक सहभागी झालेले असतात तिथेच व्यवस्थापनाचा खरा कस लागतो; पण स्वयंशिस्तीमुळे नियोजन कोलमडत नाही.

**समूहभावना :** वारी हे एकात्म आणि समूह भावनेचे उत्तम उदाहरण आहे. वर्षभर आपण 'मी' म्हणून जगत असतो. वारीत सहभागी होताना 'मी' विसरावा लागतो. मी चे 'आम्ही'त रूपांतर करून वारी माणसांमध्ये समूह भावना निर्माण करते. माणसाला व्यापक आणि प्रसरणशील बनविते. मानव ही जात आणि मानवता हा धर्म हा विचार घेऊन एकात्म भावनेने वारकरी वारीत सहभागी झालेले असतात. गरीब-श्रीमंत, लहान-मोठा, सुशिक्षित-अशिक्षित असा कोणताही भेद वारीत नसतो.

**ध्येयासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा :** वारी हे अलौकिक भक्तिनाट्य आहे. चैतन्य स्वरूप परब्रह्म पांडुरंग हे त्यांचे ध्येय आहे. वारकरी तहानभूक हरपून, प्रसंगी गैरसोयींवर मात करीत, संकटांचा सामना करीत वाटचाल करीत असतात. केवळ 'ध्येय' केंद्रस्थानी ठेवून इतर गोष्टी गौण मानून ध्येयाप्रती वाटचाल कशी करायची हे वारकऱ्यांकडून शिकायला हवे.

**समर्पण :** इतर कार्यक्षेत्रात अभावानेच आढळणारी समर्पण वृत्ती वारीत आढळते. वारकरी नेमून दिलेल्या जबाबदाऱ्या तर पार पाडतच असतात; पण त्याखेरीज आयत्या वेळी अंगावर पडलेल्या जबाबदाऱ्याही बिनबोभाट पार पाडत असतात. कार्याप्रती समर्पण कसे असावे हे वारीतून अवश्य शिकावे.

**सुसंवाद आणि सहकार्य :** 'पांडुरंग' हे ध्येय गाठण्यासाठी वारीत सहभागी झालेली माणसे अहंकार आणि स्वाभिमान विसरून वाटचाल करीत असतात. एकमेकांना 'माऊली' म्हणून साद घालत असतात. त्यांच्यात सुसंवाद असतो. सहकार्याची भावना असते. त्यातून हा जगन्नाथाचा रथ पुढे जात असतो.

**परिस्थितीला समर्थपणे सामोरे जाण्याची मानसिकता**
एका बंदिस्त इमारतीतल्या ए. सी. कार्यालयाच्या खुर्चीत बसून उत्तम व्यवस्थापक म्हणून नाव मिळवणे वेगळे, कारण तो परिघ मर्यादीत असतो. माणसे आणि समस्या मर्यादीत असतात. त्या तत्काळ सोडविण्याची सक्षम यंत्रणा उपलब्ध असते. वारीत रोज नवे गाव, नवीन परिस्थिती आणि मुख्य म्हणजे येणाऱ्या समस्यांचे प्रकार आणि आकारही वेगळे. या साऱ्यावर मात करीत वारी सुरूच राहते. वाटेत एखादा अपघात होतो, दुर्घटना घडते. पण मागचे मागे सोडून पुढची वाटचाल सुरूच राहते. परिस्थितीला समर्थपणे तोंड देण्याची वृत्ती वारीतून शिकली पाहिजे. उपलब्ध साधन सामग्रीचा सुयोग्य वापर करून गरजा भागविणे हे आदर्श व्यवस्थापनाचे सूत्र मानले जाते. ते वारीत प्रत्ययाला येते.

**आनंद आणि समाधान :** नफा, मोठे पद, लठ्ठ पगार, इन्क्रीमेंट, प्रमोशन या गोष्टी मिळूनही माणसे आनंदी नसतात. समाधानी असणे ही तर खूप दूरची गोष्ट आहे. 'जॉब सॅटिस्फॅक्शन'च्या चर्चा करीत अशी माणसे अस्वस्थ होत असतात. वारीत लाभ कोणताच नसतो. तरीही आनंद आणि समाधान वारकऱ्यांना मिळत असतो. निरपेक्ष वृत्तीने कसे काम करावे याचा तो वस्तुपाठ असतो. कामाशी पूर्णतः एकरूप झाल्यानंतर आनंद आणि समाधान मिळते याचा तो अनुभव असतो. वारी हा पाहण्याचा किंवा ऐकण्याचा विषय नाही. अनुभूतीच्या पातळीवर वारीचे जे दर्शन घडते ते माणसांना जीवनाचे व्यवस्थापन कसे करावे याचे मार्गदर्शन करते. 'ध्येय हेच पंढरपूर' आणि 'प्रयत्नांची पराकाष्ठा' हीच वारी समजून वाटचाल केली तर 'यशाचा पांडुरंग' भेटल्याशिवाय राहणार नाही. म्हणूनच 'होय होय वारकरी। पाहे पाहे रे पंढरी। असे संतांनी म्हटले आहे. वारीतले हे आदर्श व्यवस्थापन पाहिल्यानंतर 'कितीही विद्वान फक्त पहातच रहातो.

**(लेखक संत साहीत्याचे अभ्यासक आहेत.)**

# आर्थिक उदारीकरणाचे जनक : पी. व्ही. नरसिंहराव



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**पंतप्रधान बनल्यावर देशाची विस्कटलेली आर्थिक घडी सांभाळण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर होते. त्यांनी मनमोहन सिंग यांची अर्थमंत्री म्हणून नेमणूक केली. मनमोहन सिंग हे निष्णात अर्थतज्ज्ञ होते. नरसिंहराव, मनमोहन सिंग जोडीने आधीच्या सरकारचे सर्व निर्णय बाजूला ठेवून आर्थिक उदारीकरणाचा मार्ग स्वीकारला. ज्यावेळी अतिशय गंभीर आर्थिक संकटातून देश सावरला त्यावेळी नरसिंहराव यांना फादर ऑफ इंडियन इकॉनॉमिक रिफॉर्म्स असे म्हटले जाऊ लागले.**

भारताचे माजी पंतप्रधान, नवीन आर्थिक धोरणांची सुरवात करणारे, विद्वान व्यक्तिमत्व पी व्ही नरसिंहराव यांची आज १०१ वि जयंती. आजच्याच दिवशी म्हणजे २८ जून १९२१ रोजी आंध्रप्रदेशातील करीमनगर जिल्ह्यातील वंगारा या गावात त्यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण उस्मानिया विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि नागपूर विद्यापीठ येथे झाले. मातृभाषा तेलगूबरोबरच हिंदी, इंग्रजी, मराठी, कन्नड यासारख्या दहा भाषांसह सहा विदेशी भाषा देखील त्यांना अवगत होत्या. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात आणि हैदराबाद मुक्ती संग्रामात भाग घेतला. १९३५ साली हैदराबादच्या निजामाने विद्यापीठात वंदे मातरम हे गीत गण्यास बंदी घालून निजामाचे गौरव करणारे गीत गाण्याचा आदेश दिला होता तेंव्हा विद्यार्थी दशेतील नरसिंहराव यांनी त्याला कडाडून विरोध केला होता. १९६२ साली ते पहिल्यांदा केंद्रीय मंत्रिमंडळात मंत्री बनले. १९७१ सालापर्यंत ते केंद्रात मंत्री होते. या दरम्यान त्यांनी गृह, परराष्ट्र आणि संरक्षण यासारखी महत्वाची खाती सांभाळली. १९७१ ते १९७३ या काळात ते आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री होते. त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या काळात भूमी सुधारणा लागू करणारे आंध्रप्रदेश हे भारतातले पहिले राज्य बनले. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे अनेक दिग्गज नेते पराभूत झाले पण नरसिंहराव विजयी झाले. १९८४ व १९८९ ची लोकसभा निवडणूक त्यांनी महाराष्ट्रातील रामटेक मतदारसंघातून लढवली व जिंकली. १९९१ साली राजीव गांधी यांच्या हत्येनंतर ते काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष बनले. लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यावर त्यांची पंतप्रधान म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. पंतप्रधान बनल्यावर देशाची विस्कटलेली आर्थिक घडी सांभाळण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर होते. त्यांनी मनमोहन सिंग यांची अर्थमंत्री म्हणून नेमणूक केली. मनमोहन सिंग हे निष्णात अर्थतज्ज्ञ होते. नरसिंहराव, मनमोहन सिंग जोडीने आधीच्या सरकारचे सर्व निर्णय बाजूला ठेवून आर्थिक उदारीकरणाचा मार्ग स्वीकारला. ज्यावेळी अतिशय गंभीर आर्थिक संकटातून देश सावरला त्यावेळी नरसिंहराव यांना फादर ऑफ इंडियन इकॉनॉमिक रिफॉर्म्स असे म्हटले जाऊ लागले. यासाठी १९९४ साली मनमोहन सिंग यांना युरो मनीने सर्वोत्तम अर्थमंत्र्यांच्या पुरस्काराने गौरविण्यात आले तेंव्हा त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की याचे खरे श्रेय नरसिंहराव यांना दिले गेले



पाहिजे. नरसिंहराव सरकारने १९९२ सालच्या अर्थसंकल्पात परकीय गुंतवणुकीला पोषक धोरण आणले त्यामुळे शेअर बाजारात तेजीचे वातावरण निर्माण झाले. मोठ्या प्रमाणावर तोट्यात असलेल्या सरकारी संस्थांचे पुनर्जीवन करण्यासाठी खाजगीकरणाची सुरवात नरसिंहराव यांनी केली तर सेबी अर्थात सिक्युरिटी एक्सचेंज बोर्ड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंजची सुरवात देखील त्यांनीच केली. देशाच्या विकासाला गती देण्यासाठी त्यांनी खासदार निधीची सुरवात केली. सत्तेवर आल्यावर त्यांनी पंजाबमध्ये निवडणुका घेतल्या या निवडणुकीनंतर बियांत सिंग हे पंजाबचे मुख्यमंत्री बनले. त्या सरकारने दहशतवादाविरुद्ध कठोर पावले उचलून राज्यात शांतता प्रस्थापित केली. पंजाबमधील दहशतवादाचे उच्चाटन करण्यामध्ये आणि फुटीरतावादी चळवळीला क्षीण करण्यामध्ये नरसिंहराव यांनी त्यांच्या खंबीर निर्धाराचे दर्शन घडवले. नरसिंहराव म्हणायचे जग बदलले आहे, देशात देखील बदल झाले पाहिजेत. आपल्या याच सिद्धांताला सोबत घेऊन भारताच्या परराष्ट्र धोरणाला नवा आकार देत त्यांनी आग्नेय आशिआई देशांसोबत मैत्रीचा प्रारंभ लूक ईस्ट या धोरणाने केला. सत्तेवर असताना त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाल्याने १९९८ सालच्या निवडणुकीत काँग्रेसने त्यांना उमेदवारी नाकारली त्यामुळे त्यांनी राजकारण संन्यास घेतला. त्यांच्यावरील भ्रष्टाचाराचे आरोप न्यायालयात सिद्ध होऊ शकले नाहीत. २३ डिसेंबर २००४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# दीन दुबळ्यांचे कैवारी; राजर्षी शाहू महाराज



सादिक शेख

आधुनिक केसरी

**महाराजांनी अस्पृश्यांच्या उद्धाराच्या, इतक्या गोष्टी केल्या होत्या की, त्यांना अखिल अस्पृश्य समाजाचा नेता म्हणून पुढारीपण घेणे काहीच अवघड नव्हते; पण एक तर अस्पृश्योद्धाराचे जे कार्य त्यांनी केले होते, ते अत्यंत निरपेक्ष बुद्धीने केले होते आणि दुसरे असे की अस्पृश्यांचे पुढारीपण त्यांच्याच नेत्याने करावयास हवे, असे त्यांना प्रामाणिकपणे वाटत होते. त्यामुळेच माणगाव परिषदेत परिषदेत, डॉ. आंबेडकरांच्या रूपाने अस्पृश्यांनी आपला 'खरा पुढारी'शोधून काढल्याबद्दल, त्यांनी त्यांचे अभिनंदन केले होते.**

या जगात सर्वात जास्त सुसंस्कृत आपणच आहोत, असे ब्रिटिश स्वतःला समजत असत आणि अशा सुसंस्कृत लोकांनी, भटक्यांच्या बाबतीत सेटलमेंट च्या स्वरूपात, असा असंस्कृत दृष्टिकोन स्वीकारला होता. शाहू महाराजांनी ह्या बाबतीत ब्रिटिशांचे अंधानुकरण केले नाही. त्यांनी ह्या तथाकथित गुन्हेगार जमाती संबंधी वेगळाच मार्ग चोखाळला. हा मार्ग कायद्याच्या नव्हता तर अंतरीच्या मानव यादी कृतिशीलतेचा होता आणि म्हणूनच त्यांच्या जीवनाच्या वाटचालीत, त्यांना भेटलेल्या कुंचीकोरवी, वड्डु, डोंबारी, राजपूत भामटा, फासेपारधी इत्यादी अनेक गुन्हेगार समजल्या गेलेल्या जमातींना, त्यांनी जवळ केले, पोटाशी धरले आणि माणसात आणले. कोरव्याना तोरगल भागातून आणले, तर फासेपारध्यांना कटकोळ भागातून आणले. इतरांचा संचार कोल्हापूर संस्थानात होतच असे. या प्रत्येक जमातीच्या लोकांच्या ठिकाणी काही तरी कला होती व त्या कलेत ते तरबेज होते. शरीराने ते काटक व चपळ होते, तर मनाने निर्मळ व प्रामाणिक होते व पोट भरण्याचे त्यांचे व्यवसाय, अत्यंत शूद्र स्वरूपाचे होते, उदा. डोंबारी (कोल्हाटी) जातीचे लोक, जनावरांच्या शिंगाच्या फण्या, पक्ष्यांचे पिंजरे अशा वस्तु तयार करीत आणि त्यातून पोट न भागल्याने, नाचगाणी, कासरतींचे प्रयोग करून, कशीबशी गुजराण करत.

**पारध्यांच्या हातात खजाण्याच्या दिल्या किल्ल्या**

फासेपारधी तर रानावनात फिरणारी, शिकार करून चालवणारी जमात; पण निवड शिकारीवर पॉट कसे चालावे? तेव्हा चोऱ्यामाऱ्या केल्याशिवाय त्यांना दुसरा पर्यायच नव्हता. चोऱ्या करून जगणे, हाच त्यांच्या जातीचा व्यवसाय बनला होता. परिणामी, 'गुन्हेगार जमात' म्हणून सर्वात गडद शिक्का फासेपारध्यावर बसला होता. आपल्या राज्यातील फासेपारध्यांना पकडून तुरुंगात टाकने किंवा इंग्रजांच्या 'सेटलमेंटस' प्रमाणे तारेच्या कुंपणाच्या वसाहती तयार करणे, महाराजांना काही अवघड नव्हते; पण तो 'शिक्षे'चा मार्ग न स्वीकारता, त्यांनी 'प्रेमा'चा मार्ग स्वीकारला. फासेपारधी चोऱ्यामाऱ्या, दरोडे का करतात, याचा त्यांनी मुळात जाऊन शोध घेतला आणि त्यांच्या लक्षात आले की, समाजाने या लोकांस पोट भरण्यासाठी काही अन्य पर्याय ठेवलेला नाही. बेकारी आणि दारिद्र्य यातच त्यांच्या पापाचे मूळ आहे. ते काढल्याशिवाय त्यांना नीतीचा उपदेश करणे किंवा त्यांच्या गुन्ह्याबद्दल यांना शिक्षा ठोठावणे, चुकीची आहे. महाराजांचा एकदा हा विचार पक्का होताच, त्यांनी फासेपारध्यांवर एक प्रयोग करण्याचे ठरविले. सर्व जगाच्या दृष्टीने जे 'खतरनाक गुन्हेगार' ठरविले गेले होते, त्यांच्या प्रमुख पुढाऱ्यांनाच त्यांनी आपल्या निवासस्थानाच्या संरक्षणाची जबाबदारी सोपविण्याची निश्चित केले. नेमबाजीत तरबेज असणाऱ्या फासेपारध्यांच्या, लाल्या व आरव्या या पुढाऱ्यांनाच, महाराजांच्या सोनतळी कॅम्पच्या खास पहाऱ्यावरच नेमले गेले.

लोकांना वाटले की, महाराजांनी चोरांच्या हातीच जामदारखाण्याच्या किल्ल्या दिल्या आहेत; पण महाराजांचा आपल्या प्रेमाच्या समीकरणावर विश्वास होता. प्रेमाने प्रेम आणि विश्वासाने विश्वास मिळायला हवा, त्यांच्या अभिनव प्रयोगातील गृहीत तत्व होते आणि त्यांनी अनेक कसोट्या लाऊन ते सिद्ध केले. सोनतळी कॅम्पवर एकदा,"आज आत कोणालाही सोडायचे नाही", असा महाराजांनी हुकूम देताच, राजाच्या हुकमाची 100% तामिली करणाऱ्या लाल्या-आरव्याने, खुद्द राजाच्या बंधुस -बापूसाहेब महाराजांनाही-आत प्रवेश करू दिला नाही! बापूसाहेब रागाने लालबुंद होताच ते उत्तरले, "तुम्हाला आम्ही जर सोडलं, तर राजाचा हुकूम मोडल्यासारख होईल. तवा हि बंदूक घ्या, आम्हाला गोळ्या घालून आत जावा." लाल्या - अरव्यानी फासेपारध्याच्या ठिकाणी असणाऱ्या निष्ठेचे व प्रामाणिक पणाचे दर्शन घडवून, महाराजांचा प्रयोग यशस्वी केला होता.

अस्पृश्य समाजाने आपल्या मुक्तीसाठी व उन्नतीसाठी वरिष्ठ वर्गातील पुढारी घेऊ नयेत, त्यासाठी आपल्या जातीचाच पुढारी करावा, असे मत शाहू महाराजांनी अनेक ठिकाणी मांडले आहे. अस्पृश्यांचे एक नेते व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सहकारी सीताराम शिवतरकर यांना लिहिलेल्या पत्रात महाराज म्हणतात,"जो दुसऱ्या वरी विश्वासला! त्याचा कार्यभाग बुडाला! जो आपणच कष्टत गेला! तोचि जाण भला अशी माझी मते आहेत. स्वतः मी अगर बडोद्याचे महाराज किंवा हैदराबादचे निजाम अगर चंदावरकर किंवा शिंदे अशा लोकांची मते घ्यावीत; परंतु त्यांना पुढारी मात्र समजू नये. पुढारी सोमवंशीय जतीतीलच असावा.... पशुदेखील आपल्या जातीशिवाय पुढारी स्वीकारत नाहीत, मग मनुष्यांनी का स्वीकारावा? हरणाच्या कळपात कधी डुक्कर पुढारी नसते किंवा डुकरांच्या कळपात हरण पुढारी नसते. कबुतरांचे कळपात कधी बदके पुढारी नसतात किंवा बदकांच्या कळपात कधी कावळे पुढारी नसतात. मग, मनुष्यांच्या कळपात दुसऱ्या जातीचे पुढारी का असावेत? याचे कारण थोडक्यात आहे ते हे की पुढारीपणा घेतला की, बकऱ्यांसारखी किंवा ढोरांसारखी स्थिती होते. बकऱ्यांचा पुढारी धनगर असतो, त्या बिचाऱ्यांची नशिबी असते, त्यांच्या पुढाऱ्याकरिता आपला जीव देणे. विजातीय पुढारी असला म्हणजे हेच त्यांच्या नशिबी यावयाचे. हरणासारखा स्वच्छंदी पणा कोठून येणार? (सप्टेंबर १९१९)

**भटक्या-विमुक्तांचा 'देवच'**

भटके-विमुक्त समाजातील कार्यकर्ते व लेखक लक्ष्मण माने यांनी एका ठिकाणी म्हटले आहे, "शाहू महाराजांनी फासेपारधी सारख्या अनेक भटक्या विमुक्त जमातीवर, आईच्या मायेने व पित्याच्या वात्सल्याने प्रेम केले. देवाच्या ठिकाणीच आईची माया व पित्याचे वात्सल्य एकरूप असते. म्हणूनच, ही समाजाकडून तिरस्कृत झालेली माणसे, शाहू महाराजांना 'देव' मानत होती. अशा लोकांच्या श्रद्धेतच, राजश्री शाहू महाराजांचे समाजक्रांतीचे मूर्त स्वरूप पहावयास मिळते."

भटक्यांना 'माणसा'त आणणारा राजा, त्यांना आपला 'देव' वाटावा, यात नवल ते काय! या' देवा'वर त्यांची, देवळातील देवाप्रमाणे श्रद्धा व भक्ती होती. म्हणूनच जेव्हा शाहू महाराजांच्या निधनानंतर, त्यांचे पार्थिव कोल्हापुरास आणले गेले, तेव्हा त्यांचे फासेपारधी प्रजानन, धाय मोकळून रडले. कारण, त्यांचा देवा सारखा तारणहार गेला होता.

**(लेखक हे संशोधक विद्यार्थी असून समाजकारणात सक्रिय आहेत.)**

# लोकनेते : राजर्षी शाहू महाराज



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**छत्रपती शिवाजी महाराज सोडले तर अनेक राजांचा इतिहास अन्याय-अत्याचार व जुलमी राजवटीचा आहे. एकाधिकारशाहीचा, हुकूमशाहीचा आहे; परंतु छत्रपती राजर्षी शाहू महाराज मात्र याला अपवाद आहेत. हा राजा लोकशाहीचा, सामाजिक समतेचा पुरस्कार करणारा आहे, हे "एकवेळ गादी सोडीन; पण बहुजन समाजाचा उद्धार करण्याचे कार्य सोडणार नाही" या त्यांच्या वक्तव्यावरून लक्षात येते.**

राजर्षी शाहू महाराज या नावाची अख्ख्या महाराष्ट्राला ओळख आहे. त्यामुळे त्यांची नव्याने ओळख करून देण्याची गरज नाही, पण खंत ही आहे की आजची तरुण पिढी त्यांना केवळ नावाने ओळखते. त्यांची कार्ये, त्यांनी मांडलेले विचार यांची त्यांना म्हणावी तितकी माहिती नाही. वाळीत टाकल्याप्रमाणे जगणाऱ्या दलित समाजाच्या त्या काळी खंबीरपणे पाठीशी उभ्या राहणाऱ्या या लोकनायकाची, जाती पातीच्या अंधाऱ्या जगात पुन्हा अडकत जाणाऱ्या महाराष्ट्र देशाला आज पुन्हा नव्याने ओळख करून देण्याची गरज आहे.

राजर्षी शाहू महाराजांचा जन्म २६ जुन १८७४ रोजी कागलच्या घाटगे घराण्यात झाला. कागलचे जहागीरदार जयसिंगराव आबासाहेब घाटगे हे त्यांचे जन्मदाते वडील, राधाबाई ही त्यांची जन्मदाती माता. शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंतराव होते. ते दहा वर्षांचे असताना कोल्हापूरचे राजे चौथे शिवाजी यांची राणी आनंदीबाई यांनी १८ मार्च १८८४ रोजी त्यांना दत्तक घेतले. इ.स.१८८५ मध्ये त्यांना शिक्षणासाठी राजकोट येथे पाठविण्यात आले. तेथे त्यांनी चार वर्षे शिक्षण घेतले. त्यानंतर ते कोल्हापूरला परतल्यावर धारवाड येथे शिक्षणासाठी गेले. तेथे सर एस.एम.फ्रेजर यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यकारभार, इतिहास, इंग्रजी भाषा इत्यादी विषयांचे शिक्षण घेतले. धारवाड येथे शिक्षण घेत असतानाच लक्ष्मीबाई यांच्याबरोबर एप्रिल १८९१ रोजी शाहू महाराजांचा विवाह झाला. शिक्षणक्रम संपल्यानंतर वयाच्या विसाव्या वर्षी २ एप्रिल १८९४ रोजी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानच्या राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली. त्यांच्या हातात सत्तेची सूत्रे येताच त्यांनी पहिल्यांदा कोल्हापूर संस्थानातील प्रजेच्या हलाखीची पाहणी केली. संस्थानात साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प, मागासलेला समाज, अप्रवाही, जातीपातींनी दुभंगलेला व जातीयवादाने फार पोखरलेला होता. शेकडो वर्षे अस्पृश्य समाज, बहुजन समाज ज्ञान, सत्ता, संपत्ती, शिक्षण अशा अनेक गोष्टींपासून वंचित राहिला होता. चातुवर्णव्यवस्थेमुळे सामाजिक, धार्मिक, आर्थिक क्षेत्रात मागे होता. अस्पृश्य, गरीब, शेतकरी, मजूर यांचे मोठ्या प्रमाणावर शोषण होत होते. सामान्य जनता भयानक दारिद्र्य, अज्ञानाच्या, अंधश्रद्धा, रूढींच्या खाईत बुडाली होती. शिक्षण क्षेत्रात बहुजन समाज बोटावर मोजता येईल इतकाच होता. पाणी, रस्ते, शेती, व्यापार, कला अविकसित होत्या, म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या सत्तेचा उपयोग या रंजल्या- गांजलेल्या लोकांसाठी केला, हे आजच्या स्वार्थी राज्यकर्त्यांनी लक्षात घ्यायला हवे.

ब्रिटिश राजसत्तेच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी या काळामध्ये शाहू राजांनी प्रयत्न केले, सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त करून दिली. सनातनी वर्गाच्या विरोधाला न जुमानता त्यांनी दलित (अस्पृश्य) व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्वाची भूमिका बजावली. महाराजांना "राजर्षी" ही पदवी कानपूरच्या कुर्मी समाजाने दिली.

**सक्तीचे व मोफतप्राथमिक शिक्षण :** राजर्षी शाहू महाराजांच्या काळात बहुजन समाज शिक्षणापासून वंचित होता. शिक्षणाशिवाय सुधारणा होणार नाही म्हणून त्यांनी शिक्षणाला महत्व देऊन १९०७ मध्ये "मिस क्लार्क बोर्डिंग' नावाचे वसतिगृह उघडले. शिक्षणाचा प्रचार- प्रसार व्हावा म्हणून १९१६ मध्ये प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करून शाळा, महाविद्यालये, बोर्डिंग, शिष्यवृत्त्या सुरू केल्या. तसे आदेश त्यांनी जारी केले. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी राजाज्ञा काढली. स्त्रीमुक्तीची सुरुवातही महाराजांनी आपल्या घरापासूनच केली. महाराजांनी आपल्या सुनबाई इंदुमती राणीसाहेब यांना अकाली वैधव्य प्राप्त झाल्यानंतर त्यांना शिक्षण दिले. स्त्री शिक्षणास प्रोत्साहन देऊन राजाराम कॉलेजमध्ये मुलींना फी माफी दिली. स्त्रियांना शिक्षण दिले. धर्माच्या नावाखाली मुले-मुली वाहण्याची अघोरी प्रथा बंद केली. वाघ्या-मुरळी प्रतिबंधक कायदा केला. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दुष्ट पद्धत १९१९ मध्ये बंद केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला चालवावा यासाठी शिक्षण देणा-या पाटील शाळा, प्रत्यक्ष व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या, तंत्रे व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा, बहुजन विद्यार्थ्यांसाठी वैदिक पाठशाळा, संस्कृत भाषेच्या विकासासाठी संस्कृत शाळा असेही उपक्रम त्यांनी राबवले.

**आरक्षणातून प्रगती :** चातुर्वर्णव्यवस्था प्रचंड मोठ्या प्रमाणावर बोकाळलेली असल्यामुळे आणि प्रत्येकाला जातीनुसार काम वाटून दिले असल्यामुळे अस्पृश्य समाजात प्रगती होत नव्हती. शिक्षण नव्हते. खालच्या वर्गातील माणूस वरच्या वर्गात जाऊ शकत नव्हता. मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणावयाचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे. हा व्यापक दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव राहतील अशी घोषणा केली व तिची त्वरित अंमलबजावणी करुन संबंधित अधिकाऱ्यांकडून अहवाल मागविले. शाहूंच्या या निर्णयाला तेंव्हा अनेक उच्चवर्णीय पुढाऱ्यांनी विरोध केला.

**स्पृश्योद्धाराचे कार्य :** १८९९ साली कोल्हापूरात वेदोक्त प्रकरणाचा स्फोट झाला. कोल्हापूरातील ब्राह्मण वर्गाने शाहू महाराजांचे क्षत्रियत्व नाकारून त्यांना शूद्र लेखले. राजालाच जर अशी वागणूक मिळत असेल तर प्रजेच काय ? असा विचार शाहू महाराजांनी त्यावेळी केला. वैयक्तीक अपमानाकडे सुद्धा व्यापक दृष्टिकोनातून बघणारा हा राजा होता. वेदोक्त प्रकरणातील अनुभवावरून, भिक्षुकशाहीच्या जाळ्यातून मुक्त झाल्याशिवाय उच्चवर्णियांची धार्मिक व सामाजिक मक्तेदारी नष्ट होणार नाही, अशी शाहूंची धारणा झाली होती. परिणामी ते म.फुल्यांच्या सत्यशोधक विचारसरणीकडे आकृष्ट झाले. त्यांनी उघडपणे त्यांचे अनुयायीत्व स्वीकारले नसले, तरी सत्यशोधक तत्वांना त्यांचा पाठिंबा होता. त्यांच्या प्रोत्साहनामुळे महाराष्ट्रात सत्यशोधक समाजाचे पुनरुज्जीवन झाले. पारंपरिक भिक्षुकशाहीच्या वर्चस्वाला शह देण्यासाठी त्यांनी कोल्हापुरात ब्राह्मणेतर पुरोहितांची निर्मिती करण्यासाठी 'श्री शिवाजी वैदिक स्कूल' ची स्थापना केली आणि मराठ्यांसाठी स्वतंत्र 'क्षात्रजगद्गुरू' पद निर्माण करून त्यावर सदाशिवराव पाटील या उच्चविद्याविभूषित तरुणास नेमले



(१९२०). धार्मिक व सामाजिक क्षेत्रांत हा एक अभिनव प्रयोग होता. अस्पृश्य समाजातील व इतर गरीब समाजातील लोकांना सरकारी नोकऱ्या दिल्या. वकिलीच्या सनदा दिल्या. जातीयता कमी करण्याचा प्रयत्न करून त्यांना मान सन्मानाचे जीवन दिले. आज देशात वाढत असलेली जातीयता, हतबलता ही आजच्या राज्यकर्त्यांनी लक्षात घेऊन शाहू महाराजांचे कार्य लक्षात घेण्यासारखे आहे.

**आंतरजातीय विवाहाला मान्यता :** स्त्रियांच्या प्रगतीसाठी आणि जातीयता नष्ट करण्यासाठी शाहू महाराजांनी कार्य केले. १९१८ साली त्यांनी आपल्या राज्यात आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. स्वतःच्या घरात धनगर घराण्याची नाते जुळवून कृतीत उतरवून आणला. जातीयता कमी व्हावी म्हणून त्यांनी स्वतः काही आंतरजातीय विवाह घडवून आणले. १९१७ साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवाविवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. तसेच त्यांनी देवदासी प्रथा बंद करण्यासाठीही कायद्याची निर्मिती केली. १९२० मध्ये घटस्फोटाचा कायदा केला. हा राजा स्त्रियांचा सच्चा पाठीराखा होता. आज देशात होत असलेल्या स्त्रियावरील अन्याय, अत्याचारावरून आजच्या राज्यकर्त्यांचे डोळे उघडणे गरजेचे आहे.

**व्यापार, कला, क्रीडा, साहित्य व इतर कलांना मदत :** छत्रपती राजर्षी शाहू महाराजांना व्यापार, कला, नाट्य, संगीत या विषयीही आवड व आदर होता. राजर्षी शाहूंनी कोल्हापूर संस्थानात संगीत, चित्रपट, चित्रकला, लोककला आणि कुस्ती या क्षेत्रांतील कलावंतांना राजाश्रय देऊन त्यांना प्रोत्साहन देण्याचे महत्त्वाचे कार्य केले. अल्लादिया खान यांच्यासारख्या गायकाला, बाबूराव पेंटरला आश्रय दिला. नाटक कंपन्या सुरू केल्या.

राजर्षी शाहू महाराजांनी व्यापारी क्षेत्रात गरुड झेप घेऊन सूतगिरण्या, कापडगिरण्या वाढविल्या. शेतीसाठी, शेतकऱ्यांसाठी बंधारे बांधले. शेतीसाठी कर्ज, शेतीच्या विकासासाठी संशोधन, नाविन्यता आणि तंत्रज्ञानाच्या वापरास चालना, भविष्यात दुष्काळाला सामोरे जावे लागू नये यासाठी राधानगरी सारख्या धरणांची बांधणी असे उपक्रम त्यांनी यशस्वीरित्या राबविले.

अशाप्रकारे राजर्षी शाहू महाराज हे सामान्य माणसात मिसळणारे, सामान्यांसाठी झटणारे राजा होते. त्यांच्या सर्वांभिमुख विकासाच्या दृष्टिकोनामुळे इतिहासकारांनी त्यांची नोंद लोककल्याणकारी राज्यकर्ता म्हणून केली आहे. ६ मे १९२२ रोजी मुंबई येथे त्यांचे निधन झाले. आपल्या २८ वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी शिक्षण, कृषी, उद्योग, कला, क्रीडा व आरोग्य अशा सर्वच क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान आणि चालना दिली. सामाजिक लोकशाही निर्मितीसाठी शाहू महाराजांनी अतोनात कष्ट उपसले. सर्वांना न्याय मिळावा, माणुसकीचे हक्क मिळावेत, अस्पृश्यांना समानतेची व माणुसकीची वागणूक मिळावी, वैज्ञानिकता त्यांच्या अंगी यावी म्हणून त्यांनी आपल्या सत्तेचा उपयोग केला. यावरून शाहू महाराजांचे मोठेपण हे लक्षात यायला लागते. आज मात्र आम्ही व आमच्या राज्यकर्त्यांनी छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचा आदर्श बाजूला ठेवला आहे. त्यांचे नाव घेऊन आम्हीही त्यांचेच आहोत म्हणणारेही त्यांच्या विचाराने वागत नाहीत उलट आपल्या सत्तेचा गैरवापर करताना दिसतात. मानवी मूल्य पायदळी तुडवताना दिसतात. ज्या शाहू महाराजांनी लोकशाही निर्मितीसाठी कष्ट उपसले, त्याच लोकशाहीचे धिंडवडे काढताना आजचे राज्यकर्ते आम्हाला दिसत आहेत. आम्ही समाजाचे काही देणे आहोत, समाजाच्या प्रगतीसाठी आपलेही काही योगदान असावे, असे मात्र आत्ताच्या कुठल्याच राज्यकर्त्यांना वाटत नाही एवढे भयावह चित्र डोळ्यासमोर उभे राहते. स्वार्थासाठी, मतलबासाठी, जातीसाठी, धर्मासाठी राजकारण करणे चालू आहे परंतु मानवतेसाठी, मानवी कल्याणासाठी राजकारण करावे लागते हे मात्र त्यांनी राजर्षी शाहू महाराजांकडूनच शिकायला हवे, त्या पद्धतीनेच आपली सत्ता पुढे घेऊन जायला हवी व सामान्याचे हित जोपासायला हवे. त्यांचे आदर्श कार्य डोळ्यासमोर ठेवून वर्तमान सरकारांनी राज्यकारभार केल्यास ख-या अर्थाने रयतेचे राज्य होईल. कोरोना आपत्तीत जनतेला दिलासा, रोजगार गेलेल्या लोकांना काम, छोटे-मोठे उद्योग करणा-यांना आर्थिक सहाय्य करावे. शेतक-यांसाठी पाणी, वीज आणि बियाणांची उपलब्धता, आपत्तीग्रस्तांना मदत करावी. मोफत लसीकरण, गरीब-वंचित विद्यार्थ्यांना स्मार्टफोनचे वाटप, इंटरनेटची प्रभावी व्यवस्था, ऑनलाइन अध्यन-अध्यापन-मूल्यांकन प्रभावी आणि परिणामकारक करण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण द्यावे. वेगवेगळ्या प्रशिक्षण संस्था न काढता सर्व मागासलेल्या जाती-जमातींसाठी एकच संस्था असावी. आज त्यांच्या विचारांची, आचारांची व कृतीची देशाला गरज आहे. प्रत्येक मानवाने त्यांच्या विचाराने कार्य केले तर देशाची प्रगती व्हायला वेळ लागणार नाही. अशा या राजर्षी व्यक्तिमत्त्वास मानाचे अभिवादन !

# माजी आमदार पाशा पटेल यांचा 'फिनिक्स' उद्योग!



आधुनिक केसरी

**शेतकरी संघटनेच्या चळवळीतून पक्षीय राजकारणात सक्रीय असताना फारशी संधी मिळाली नाही. कोणतेही पाठबळ नाही. असे असताना माजी आमदार पाशा पटेल यांनी लोदगा लातूर तालुक्यातील लोदगा येथे शेकडो लोकांना रोजगार देणारा उद्योग उभा केला आहे. नवनिर्मितीवरच माणसाचे कर्तृत्व अधिक उजळते. याचाच प्रत्यय फिनिक्स फाऊंडेशन ठरला आहे.**

माजी आमदार पाशा पटेल यांच्या लोदगा (ता. लातूर) येथील फिनिक्स फाऊंडेशनला शनिवार दि. 25 जून रोजी जाण्याचा योग आला. बारा वर्षात पटेल यांनी दीडशे एकर माळरानावर पारंपारीक शिक्षणाबरोबरच कुशल रोजगार देणारे शिक्षण आणि 'बांबु' लाकडापासून शेकडो वस्तू तयार करणारा देशातील दुसरा मोठा उद्योगच उभारला आहे. बांबूपासून तयार केलेले टी-शर्ट भेट देऊन त्यांनी सर्व परिसर फिरून दाखवला.

शेतकरी संघटनेत पाशा पटेल यांनी आपल्या भाषणांनी व्यक्तिमत्त्वाची ओळख निर्माण केली. ग्रामीण ढंगातील भाषणांनी त्यांनी एक काळ गाजवला. दिवंगत गोपीनाथ मुंडे यांनी त्यांना भाजपात घेऊन विधान परिषदेवर संधी दिली. काही काळ कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले. मात्र त्यांचा संपर्क, सभा जिंकण्याचे वक्तृत्व या तुलनेत त्यांना राजकारणात फारशी संधी मिळाली नाही. सामान्य कुटुंबातील व्यक्ती राजकारणात सक्रिय झाल्यानंतर राजकीय पदाच्या पाठीमागे धावण्यातच आपल्या क्षमता खर्च करताना दिसतात. काही अपवादच राजकारणात काम करताना संस्थात्मक आणि उद्योगात निर्मिती करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. पाशा पटेल यांनी बारा वर्षापूर्वी लोदगा येथे शैक्षणिक संकुल उभारण्याची सुरुवात केली. शिक्षणाच्या पातळीवर प्रगत आणि प्रस्थापित जिल्ह्यात पाशा पटेल यांचा निभाव लागेल का? अशी शंका साहजिक होती. मात्र अत्यंत मेहनतीने त्यांनी शिक्षणाबरोबरच बांबूचा एक उद्योग समूहच उभारला आहे. काही वर्षापासून पटेल यांनी पर्यावरण संरक्षणासाठी बांबू लागवडीची चळवळ देशभर सुरू केली आहे. बांबुबाबत अभ्यासपूर्ण मांडणी आणि जोडीला प्रत्यक्ष उद्योगाची कृती असा समन्वय साधून पटेल यांनी बांबुवर ऐतिहासिक काम केले आहे. संजय करपे यांच्या सहकार्याने बांबूपासून कपडा ते दैनंदिन वापरातील शेकडो वस्तू निर्माण करण्याचा अद्यावत उद्योग सुरू करुन हजारो लोकांना रोजगारही उपलब्ध करुन दिला आहे. देशात पहिल्यांदाच बांबुवर प्रक्रिया करणाऱ्या दोन अद्यावत मशीनही त्यांनी आणल्याचे सांगितले. मध्यंतरी बांबूपासून तयार झालेल्या खुर्च्या केंद्रीय मंत्र्यांपासून, मुख्यमंत्री आणि अनेक राजकारण्यांना भेट दिल्या. राजकारणात खुर्च्यांसाठी ओढाओढ सुरू असताना पाशा पटेल मात्र खुर्च्या वाटत आहेत. सभांमध्ये केवळ मोकळं-चाकळं भाषण करत नाही तर लोकांना रोजगार देणारा उद्योगही उभारला असल्याने पाशा पटेल यांचे महत्व अधिक आहे. माणसांनी आपल्या क्षमतांचा वापर केला तर काय चमत्कार होऊ शकतो? हे पहायचे असेल तर कार्यकर्त्यांनी पाशा पटेल यांच्या लोदग्यात जायला पाहिजे, दिशा मिळाल्याशिवाय राहणार नाही.

वसंत मुंडे
प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ

# सुरेखा पुणेकरांची भन्नाट "नटरंगी नार", लावणीला नेलं त्यांनी सातासमुद्रापार

आधुनिक केसरी




बंदिस्त नाट्यगृह, सरकता रंगमंच, त्यावर मनभावन आकर्षक बैठकीचा देखावा. समोर बसलेलं, नववारी साडीतलं अवखळ बावन्नकशी, आरसपानी सौंदर्य. तुडुंब भरलेलं सभागृह. आणि, दिलखेचक अदाकारीनं सुरु होणारी "या रावजी, तुम्ही बसा भावजी, कशी मी राखू तुमची महरजी... अन, बसा भावजी.!" ही बैठ्या लावणीची लकेर घुमायची. हाताच्या कमानीतून धनुष्याचा बाण सुटायचा. नृत्यांगनाच्या डाव्या डोळ्याची पापणी क्षणभर लवाची. प्रेक्षागृहात रसिक घायाळ व्हायचे. आणि, शिट्ट्या, टाळ्यांचा कडकडाट व्हायचा. शेले पागोट्याची उधळण होत, प्रेक्षकांनी सारं सभागृह डोक्यावर घेतलेलं असायचं. हा प्रकार ९० च्या दशकात महाराष्ट्रभर रुजवला, तो लावणी सम्राज्ञी सुरेखा पुणेकर यांनी. त्यांच्या "नटरंगी नार" या लावणीच्या कार्यक्रमाने महाराष्ट्र, देशच नाही, तर अमेरीकेतही लावणीला प्रतिष्ठा मिळवून दिली. महाराष्ट्राला लावणी तशी नवी नाही. लावणी ही मर्दानी महाराष्ट्राची खरी ओळख. मात्र, मराठी चित्रपटांनी लावणी आणि पाटील यांना इतकं भडक दाखवलं, त्यातून लावणी आणि गावचा पाटील यांच्याबद्दल गैरसमजच अधिक पसरले. याला काही सन्माननीय लावणी कलाकार अपवाद असले, तरी लावणीकडे बघतांना सर्वसामान्य, मध्यमवर्गीय लोकं, नाकंच मुरडायची. मात्र, सुरेखा पुणेकर यांनी लावणीला लोकप्रियच केलं नाही, तर तिला घराघरात पोहचवली. सभ्य, सुसंस्कृत, मध्यमवर्गीय घरातील महिलांना त्यांनी, लावणीचे कार्यक्रम बघण्यासाठी थिएटरपर्यंत चक्क ओढून आणलं. लावणीचं वेड लावलं. पुरुषांसारखं महिलांनाही लावणी बघतांना, ऐकतांना शिट्ट्या, टाळ्या वाजवायला भाग पाडलं. लावणी बघणं, ऐकणं वाईट नाही, तर ती एक पवित्र लोककला आहे, हा समज समाजात दृढ केला. अश्या लावणी सम्राज्ञीला बघण्याचं, ऐकण्याचं, त्यांच्याशी बोलण्याचं, माझं औत्सुक्य वाढू लागलं. आणि, एक दिवस ध्यानीमनी नसतांना, चक्क सुरेखा पुणेकरांच्या समोर उभं राहण्याचा योग आला. देशदूत वर्धापनदिनाला, त्यांचं स्वागत करण्याची संधी मला मिळाली. त्यांच्या सोबत स्नेहभोजन करता आलं. मनमोकळा संवाद साधता आला. त्यांची एकूण वाटचाल जाणून घेता आली. ती भेट माझ्या आयुष्यातली, एक अविस्मरणीय भेट झाली. सुरेखा पुणेकरांसोबतच्या त्या क्षणांचं, अत्तर झालं. तो दरवळ चिरंजीव झाला. आणि, आयुष्यभरासाठी माझ्या हृदयात बंदिस्त झाला.

जळगावच्या जेडीसीसी सभागृहात सुरेखा पुणेकर यांचा लावणीचा "नटरंगी नार" ह्या कार्यक्रमाचे दोन शो २४ आणि २५ डिसेंबरला होणार अश्या जाहिराती झळकल्या. हा योग चुकायला नको अशी मनाशी खूण गाठ बांधली. आणि, माझा लहान बंधू भरत चौधरी, जो देशदूतला उपसंपादक होता, त्याने एक आनंद वार्ता दिली. सुरेखा पुणेकरांची मुलाखत घेण्याची संधी त्याला मिळाली होती. त्याने २३ तारखेला सभागृहात जावून, त्यांची मुलाखत घेतली. त्याच्या दुसऱ्या दिवशी देशदूतचा वर्धापन दिन होता. भरतने संपादक आणि व्यवस्थापकांशी बोलून, त्यांना भेटीचे आमंत्रण दिले. त्यांनीही होकार भरुन आनंद द्विगुणित केला. २४ डिसेंबरला वर्धापन दिनाची वर्दळ सुरु होती. मी माझे मित्र डॉ. संजीवकुमार सोनवणे, नगराध्यक्षा सौ. पुष्पाताई महाजन आणि माजी नगराध्यक्ष ज्ञानेश्वर महाजन यांच्यासह कार्यक्रमाला उपस्थित होतो. तोच भरत आणि नरेंद्र सोनवणे यांची गाडी कार्यक्रम स्थळी आली. त्यातून एक भारदस्त, शालीन व्यक्तीमत्व, दमदार पावलं टाकत मुख्य स्टेजकडे आल्या. त्या सुरेखा पुणेकर होत्या. चेहऱ्यावर कोणताही मेकअप नाही. साधी साडी आणि चेहऱ्यावर मंद स्मित. सारेच त्यांच्या उपस्थितीने भारावून गेले. महाव्यवस्थापक आर. के. सोनवणे, संपादक सुभाष सोनवणे, व्यवस्थापक सुनिल ठाकूर यांच्या उपस्थितीत सुरेखा पुणेकरांचं स्वागत करण्याचा मान मला मिळाला. आणि मी धन्य झालो. एका लोकमान्य लोककलावंताची ती भेट, माझ्यासारख्या कलावंत आणि साहित्यिकासाठी उर्जा देणारी ठरली. मी कविता, गीत लेखन करतो, हे ऐकून त्या अधिकच प्रभावित झाल्या. लावण्याही लिहता कां? अशी विचारणा सुरेखाताईंनी केली. मात्र, तो प्रकार मी हाताळला नाही, अशी नम्र कबुली मी दिली. यातून आमची कलावंत म्हणून तार जुळली. गर्दी, कोलाहलापासून दूर जात, आम्ही एकत्र भोजन घेतलं. त्यांचे सूत्रसंचालक बच्चू पांडे यांनी गप्पांची मैफल सुरु केली. तोच धागा पकडत सुरेखाताईंशी मला बोलता आलं. एका यशस्वी लावणी सम्राज्ञीचा संघर्षमय जीवन प्रवास जाणून घेता आला. जेवणं आटोपली, तोपर्यंत त्यांचा जीवनपट उलगडला होता. शुन्यातून विश्व उभं करणारी एक सिध्दहस्त कलावंतीण, अत्यंत साधेपणाने वावरत होती. निरोपाच्या वेळी त्यांनी आम्हाला, दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमाच्या व्हीआयपी पासेस दिल्या. कार्यक्रमाला येण्याचा आग्रह करुन, त्या मनाला एक चुटपूट लावून, वीजेसारख्या निघून गेल्या.

दुसऱ्या दिवशी आम्ही व्हीआयपी पासेस घेवून, विशेष निमंत्रित म्हणून "नटरंगी नार" चा कार्यक्रम "याची देही, याची डोळा" अनुभवला आणि कृतकृत्य झालो. एकापेक्षा एक बहारदार लावणीने कार्यक्रम रंगत होता. सुरेखाताई प्रत्येक लावणीला आपल्या अंगभूत गुणांनी, एक एक रंग खुलवत होत्या. सुरेल, लडिवाळ गाणं, ऐटदार, डौलदार नृत्य आणि हजारो रसिकांना घायाळ करणारी, दिलखेचक अदाकारी. नखरेल नजर, घरंदाज सौंदर्य आणि नेत्रसुखद नृत्याविष्कार असा त्रिवेणी संगम, म्हणजे सुरेखा पुणेकर. या रावजी बसा भावजी, पिकल्या पानाचा देठ की हो हिरवा, कारभारी दमानं, इचार काय हाय तुमचा वं पाव्हणं, पतंग उडवित होते आणि अश्याच अनेक लावण्यांनी वन्समोर घेत, कार्यक्रम कधी संपला, ते रसिकांना कळलेच नाही. प्रेक्षक सभागृहातून बाहेर पडायला तयार नव्हते. वन्समोअरचा घोषा सुरु होता. पडदा पडला होता. तोच सुरेखा पुणेकर, रसिकांना हात जोडत, रंगमंचावर आल्या. त्यांनी रसिकांच्या प्रेमाचं ऋण व्यक्त केलं. आणि वेळेची मर्यादा पटवून दिली. प्रेक्षक भारावून बाहेर पडू लागला. एक अतृप्ता घेवून. कोणत्याही कलेची आणि कलावंताची हीच अपेक्षा असते, कार्यक्रम समेवर असतांना तो संपावा. अजून पुढे काय.? याची उत्सुकता असतांना, निरोप घेण्याची वेळ यावी. कलावंत ऋणाईत व्हावा आणि रसिक खूप सारं मिळूनही अतृप्त रहावा. हा सुंदर सोहळा आम्ही प्रत्यक्ष अनुभवत होतो. एका लावणी सम्राज्ञीला, तिच्या सर्वोच्च यशाच्या काळात अनुभवत होतो. साधनेशिवाय कला-कलावंत शिखरावर पोहचत नाही, याचा वस्तुपाठ शिकत होतो. यशोशिखरावर पोहचणं तसं फार कठीण नाही. ते साधनेनं शक्य आहे. मात्र, यशोशिखरावर दीर्घकाळ टिकणं, हे सहज शक्य नाही. अनेकजण तिथं पोहचून रसातळाला गेल्याची अनेक उदाहरणं आहेत. मात्र, जो कलावंत सदैव विनम्र, ऋणाईत राहतो, तोच शिखरावर दीर्घकाळ टिकून राहतो. ते सुरेखा पुणेकरांना जमलं. कारण त्या आपला भूतकाळ विसरल्या नाहीत. आपला संघर्ष त्यांनी नजरेआड होवू दिला नाही. त्यांच्याशी झालेल्या संवादातून हे नवनीत माझ्या हाती लागले होते.



लावणी सम्राज्ञी सुरेखा पुणेकरांचे देशदूत परिवारात स्वागत करताना. सोबत बंधू उपसंपादक भरत चौधरी, डॉ. संजीवकुमार सोनवणे आणि निवेदक बच्चू पांडे.

सुरेखा पुणेकर यांचा २९ नोव्हेंबर १९७८ रोजी पुणे येथे झाला. त्यांचे वडील कोंडीबा ठाकरे, टाकळीकर हे तमाशा कलावंत.फावल्यावेळेत ते पुणे स्टेशनवर हमाली करायचे. आई धुणीभांडी करायची. त्या पाच बहिणी आणि एक भाऊ. त्यातील सुरेखा या चार नंबरच्या. एका झोपडपट्टी ते राहायचे. पानशेतच्या धरणात त्यांची झोपडी वाहून गेली, तेव्हा त्यांना स्वारगेट जवळ, एका चाळीमध्ये छोटीशी दहा बाय दहाची खोली मिळाली. त्यात जेमतेम गुजरा करून आणि बैलगाडी वरचा तमाशा करत,आई, वडील, बहिणी, भाऊ आपली गुजराण करत होते. याच काळात त्यांनी धुणीभांडी करत सुहासिनी देशपांडे यांच्याकडे कथ्थक नृत्याचे धडे गिरवले. घरात तमाशाचं वातावरण असल्याने, त्याही आपसूक गाणं आणि नृत्याकडे वळल्या. वयाच्या आठव्या वर्षी त्यांनी चावली पावलीच्या तमाशामध्ये आपली सुरुवात केली. ८५-८६ साली, झाडाखाली तमाशा करून त्यांनी आपली कला जोपासली. खेड तालुक्यातील पाईटपाड येथे त्यांचा पहिला तमाशा झाला. त्यानंतर दत्तोबा तांबे, चंद्रकांत ढवळपुरीकर यांच्या तमाशात त्यांनी काम केलं. १९९४ ला त्यांनी आपला स्वतःचा लता-सुरेखा पुणेकर यांचा तमाशा सुरू केला या क्षेत्रात बऱ्यापैकी जम बसल्यावर १९९८ला त्यांनी नारायणगाव येथील लावणी महोत्सवात सहभाग घेतला. दोन दिवस चालणाऱ्या या महोत्सवांमध्ये, पहिल्याच दिवशी त्यांच्या "या रावजी, तुम्ही बसा भावजी" या लावणीने रसिकांना भुरळ घातली. दुसऱ्या दिवशी वेगवेगळ्या ४ लावण्या सादर करून, त्यांनी महोत्सवाचं एक लाख रुपयाचं विजेतेपद पटकावलं. त्यांना मिळालेला प्रतिसाद इतका प्रचंड होता, की संयोजकांनी त्यांना, जाहीर केलेल्या एक लाख ऐवजी दोन लाख रुपयाचे बक्षीस दिले. याच कार्यक्रमात सुप्रसिद्ध संगितकार नौशद यांनी, खुश होवून त्यांना ५००र.बक्षिस दिलं. हा आपल्या जीवनातील सर्वोच्च आनंदाचा क्षण होता, असे त्या म्हणतात. या पाच नोटांची आणि त्या दिवशी नेसलेल्या साडीची, त्या दर दिवाळीला पूजा करतात. यानंतर त्यांनी कधीही, मागे वळून बघीतलेच नाही.

सुरेखा पुणेकरानी अकलूज येथून, आपला स्वतःचा "नटरंगी नार, उडवी लावणीचा बार" हा कार्यक्रम सुरू केला. पायाच्या नखापासून तर, केसांच्या टोकापर्यंत झाकलेली स्त्री, लावणी नृत्य सादर करत असूनही, लोकांचा लावणीकडे बघण्याचा दृष्टिकोण दूषित होता, याची त्यांना सतत खंत वाटायची. यासाठी त्यांनी संक्रांतीच्या मुहूर्तावर, पुण्याच्या बालगंधर्व नाट्यगृहांमध्ये, फक्त महिलांसाठी "नटरंगी नार" या कार्यक्रमाचे आयोजन केलं. खरं म्हणजे, हा अतिशय धाडसी प्रयोग होता. मात्र, लावणीला जनमानसांत पोहचवण्यासाठी, आपण काही वेगळी वाट निवडायला हवी, या संकल्पनेतून त्यांनी, नाट्यगृहाबाहेर नृत्यांगना उभ्या करून, येणाऱ्या प्रत्येक महिलेच्या हातावर, तिळगुळासह मोगऱ्याचा गजरा आणि एक शिटी भेट दिली. कार्यक्रम सुरू झाल्यावर कार्यक्रमाचे सादरीकरण, दर्जा आणि सुरेखा पुणेकर यांची तळमळ उपस्थित महिलांना एवढी भावली, की त्यांनी शिट्या वाजवून, गजरे हवेत उडवून थिएटर डोक्यावर घेतले. त्यानंतर प्रत्येक जिल्ह्यात, महिलांसाठी लावणीचे स्वतंत्र कार्यक्रम व्हायला लागले. उच्चभ्रू, मध्यमवर्गीय, सुसंस्कृत घरातील महिलादेखील, लावणीच्या कार्यक्रमाला हजेरी लावू लागल्या. हे सुरेखा पुणेकर यांनी. लावणीला दिलेले महत्त्वाचे योगदान आहे.

लावणिने आपल्याला खूप यश, प्रसिद्धी आणि पैसा दिला असून, झोपडपट्टीत राहणाऱ्या एका सामान्य कलाकाराला समाजातील प्रतिष्ठित वसाहतीत आणून बसवले आहे, असं ते अभिमानाने सांगतात. ज्यांना लावणी शिकायची आहे, परंतु घरची परिस्थिती अडचणीची आहे, अशांसाठी त्या स्वतः पुढाकार घेऊन, लावणी शिकवण्याचे वर्ग घेतात. या वर्गाला कॉलेजमध्ये जाणाऱ्या विद्यार्थिनी ते प्राध्यापिकाही येतात, असं त्या सांगतात. इंदोर येथील प्रा. दिपाली राठी, या त्यांच्याकडून लावणीचे धडे गिरवत आहेत. त्यांनी मनोहर नरे यांच्या ओम नाट्यगंध या संस्थेतर्फे माया जाधव, शहाजी काळे यांच्यासोबत "बैठी लावणी" आणि मोहन वाघ यांच्या सोबत "सुंदरा मनामध्ये भरली" हे कार्यक्रम केले आहेत. सहकलाकार म्हणून त्यांचे दहा-बारा चित्रपट असून त्यात त्यांनी लावण्या सादर केल्या आहेत. सजना तुझ्यासाठी, घरंदाज आणि तुका पाटील या चित्रपटात त्यांनी मध्यवर्ती भूमिका केलेल्या आहेत कार्यक्रमा पुरतच चेहऱ्यावर मेकअप लावायचा हा त्यांचा नियम असून, इतर वेळेस त्या विना मेकअप राहतात. यामुळे कार्यक्रमा व्यतिरिक्त त्या बाहेर भेटल्या, तर आपण त्यांना ओळखूही शकणार नाही. इतकी त्यांची राहणी साधी असते. २०११ साली त्या अमेरिकेच्या दौऱ्यावर गेल्या होत्या. व्हिसा घेण्यासाठी त्या कान्सुलेटमध्ये गेल्यावर, तेथील अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे बघत तुम्ही सुरेखा पुणेकर नाहीत, असं म्हणून त्यांना चक्क व्हिसा नाकारला होता. मात्र, त्यांच्यासोबत उपस्थित असलेल्या सुधीर भट यांनी, कान्सूलेट मध्येच त्यांना एक लावणी म्हणायला सांगितली. ती ऐकताच अधिकाऱ्यांनी त्यांना ओळखले आणि तात्काळ विसा दिला. या घटनेतून, "आपला आवाज, हीच आपली ओळख आहे" असं ते अभिमानाने सांगू लागल्या. आपल्यासाठी लावणी हे सर्वस्व असून, आपण घुंगरांची देवासारखी पूजा करतो, असं त्या सांगतात ! कला हीच पूजा मानणाऱ्या, लावणी सम्राज्ञीसोबत आपले काही क्षण सत्कारणी लागलेत, ही जाणिवच मला वेळोवेळी श्रीमंत करत असते.

# नवउद्योजकांचा मार्गदर्शक : 'रिवर्क'



संध्या सिनकर
संपर्क क्र. 9920740645

आधुनिक केसरी

**हे पुस्तक ज्यांनी व्यवसाय सुरू करण्याचा विचारही केला नाही, ज्यांचा व्यवसाय उत्तम सुरू आहे, जे लोक व्यवसायात पडायला घाबरतात, ज्याना चाकोरीबद्ध काम करताना स्वतःचं काही करायचं आहे अशा सर्व लोकांना चांगलं मार्गदर्शन करत. हल्ली तुम्ही रोजची नोकरी करत असताना आठवड्याला १० ते ४० तास काम करून व्यवसाय सुरू करू शकता. काम करण्याची पद्धत बदलून काटकसरीने व्यवसाय केला तर पैसा मिळू शकतो. या पुस्तकात १२ प्रकरणे आहेत. त्यामध्ये व्यवसाय करताना कोणत्या गोष्टी टाळाव्यात, कोणत्या गोष्टींवर भर द्यावा हे विषद करून सांगितले आहे.**

लेखक जेसन फ्राईड व डेव्हिड हॅन्सन यांची कंपनी वेब डिझाईन विषयी सल्ला देते आणि ऑनलाइन टूल्स छोट्या कंपन्यांना व बिझनेस ग्रुप्सना विकते. त्यांनी स्वतःची नफ्यात असणारी कंपनी मुद्दाम छोटी ठेवली आहे. व्यवसायाच्या दहाहून अधिक वर्षात त्यांनी दोनदा आर्थिक मंदी, चलनफुगवटा, तेजी-मंदी चे अंदाज पाहिले आहेत. त्यांच्या स्वतःच्या व्यावसायिक अनुभवातून त्यांनी व्यवसाय सुरू करण व तो भरभरटीला आणण याविषयी सरळ सोप्या शब्दात सांगितलं आहे.

हे पुस्तक ज्यांनी व्यवसाय सुरू करण्याचा विचारही केला नाही, ज्यांचा व्यवसाय उत्तम सुरू आहे, जे लोक व्यवसायात पडायला घाबरतात, ज्याना चाकोरीबद्ध काम करताना स्वतःचं काही करायचं आहे अशा सर्व लोकांना चांगलं मार्गदर्शन करत. हल्ली तुम्ही रोजची नोकरी करत असताना आठवड्याला १० ते ४० तास काम करून व्यवसाय सुरू करू शकता. काम करण्याची पद्धत बदलून काटकसरीने व्यवसाय केला तर पैसा मिळू शकतो. या पुस्तकात १२ प्रकरणे आहेत. त्यामध्ये व्यवसाय करताना कोणत्या गोष्टी टाळाव्यात, कोणत्या गोष्टींवर भर द्यावा हे विषद करून सांगितले आहे. प्रत्येक प्रकरणात उपयुक्त अशा गोष्टी नेमकेपणाने एक दोन पानात सांगितल्या आहेत. त्याना दिलेले समर्पक हेडिंग आणि त्या बरोबरची छोटी चित्रे यामुळे रीवर्क हे जेसन फ्राईड व डेव्हिड हॅन्सन यांनी लिहिलेले, अमृता देशपांडे यांनी अनुवाद केलेले पुस्तक देखणे झाले आहे. व्यवसायातील एकेका गोष्टीचा स्वतंत्रपणे विचार करून पारंपरिक गोष्टी का सोडून द्यव्यात हे त्यांनी सांगितले आहे.

आपण एखादी नवीन कल्पना सांगतो तेव्हा हे असलं काही प्रत्यक्षात चालत नाही असंच कायम ऐकावं लागतं. प्रत्यक्षात नव्या कल्पना, वेगळा दृष्टिकोण, निराळ्या संकल्पना नेहमीच नाकारल्या जातात. परंपरेने माहीत असलेल्या गोष्टी किती तोकड्या व चुकीच्या असल्या तरी त्याच वापरल्या जातात.

चुकांमधून शिकणं या गोष्टीला फाजील महत्त्व मिळाले आहे. अपयशाला तुमच्या मार्गात येऊन देऊ नका. यश तुम्हाला खरं मदत करत. जेव्हा यश मिळत तेव्हा कोणती गोष्ट काम करते हे तुम्ही शिकता आणि ती पुढच्या वेळी अधिक उत्तम प्रकारे करू शकता.

प्रगती आणि व्यवसाय यांचं विस्तार हेच ध्येय असावे असं नाही. लहान असणं ही कायम मोठे होण्याच्या मार्गातील पायरी नाही. आपल्या व्यवसायासाठी योग्य मर्यादा शोधून आपण तिथे स्थिर राहू शकतो.

काहीतरी वेगळं, अर्थपूर्ण करा. उत्कृष्ट उत्पादन किंवा सेवा करण्याची सर्वात सोपी व सरळ पद्धत म्हणजे तुम्ही स्वतः जे वापराल ते तयार करणं. तुमची कल्पना, तुम्ही चांगल्या प्रकारे अमलात आणा. तुमची सध्याची नोकरी-व्यवसाय सांभाळून थोडावेळ तुमच्या कल्पनेवर काम करा. तुम्हाला नेमकं काय हवंय ते तुम्ही तुम्हाला हवं तसे डिझाईन करू शकता. तुमचा बिझनेस नवीन असतो तेव्हा काटकसर करायला हवी. अनेक मोठ्या कंपन्याची सुरवात गॅरेजमध्ये झाली आहे.

काम सोपं ठेवा. निर्बंध घाला. सगळ्याच गोष्टी अर्धवट करण्यापेक्षा अर्ध्या गोष्टी चांगल्या करा. एखादी नवीन गोष्ट सुरु करताना त्यातील अतिशय महत्त्वाच्या गोष्टीपासून, केंद्रबिंदू पासून सुरुवात करा. पायाभूत गोष्टी आधी वेगळ्या करा. नंतर तपशीलाकडे लक्ष द्या.


तुमच्या व्यवसायाचा गाभा स्थिर गोष्टीवर बांधला गेला पाहिजे. ज्या गोष्टी आज किंवा काही वर्षानंतरही हव्या आहेत त्यामध्येच गुंतवणूक करायला हवी.

कल्पक व्यावसायिक हे बाय प्रॉडक्ट ओळखतात व त्यामध्ये ही संधी होतं शोधतात. गरजा कमी करा व आवश्यक त्या गोष्टींवर खर्च करा.

तुम्ही करत असलेलं काम गरजेच, महत्वाच आहे का ते समजून घ्या. तुम्ही सोडवत असलेली समस्या काल्पनिक नाही ना?

कधीकधी उत्साह व उपयुक्तता यांचा गोंधळ होतो. प्रत्येक वेळेस सोपा व योग्य मार्ग शोधण्याचा प्रयत्न करा. वाईट अनावश्यक कामावर वेळ घालवू नका. व्यत्यय हा उत्पादकतेचा शत्रू आहे. विनाव्यत्यय एकांतात काम लवकर पूर्ण होतं.

मीटिंग कमी वेळासाठी घ्या. अजेंडा स्पष्ट असू द्या. कमीत कमी माणसांना मीटिंगमध्ये बोलवा. नेमक्या समस्येने सुरुवात करा व




योग्य उपाययोजनेने शेवट करा आणि बदल करण्याची जबाबदारी योग्य माणसावर सोपवा.

गतीमुळे प्रेरणा मिळते. प्रेरणेमुळे गती मिळते. तुमची गती आणि प्रेरणा कायम ठेवण्यासाठी लहान लहान विजय साजरा करण्याची सवय लावून घ्या. लहानशी प्रगतीही गती देऊ शकते.

मोठ्या गोष्टींचे लहान लहान तुकडे करा व लहान निर्णय घ्या. काम जितकं लहान असेल, तितका त्याचा अंदाज बांधायला सोपा. लहान निर्णय घ्या. कामांची एक मोठी यादी करण्यापेक्षा छोट्या छोट्या याद्या करा. त्यामुळे करावे लागणार काम कमी झालं नाही तरी लहान चित्र पाहून समाधान, प्रेरणा व प्रगती झाली आहे अशी भावना निर्माण होते. मोठं चित्र बघुन घाबरून, गोंधळून जायला होतं.

नाही म्हणायची सवय लावून घ्या. नम्रपणे नाही म्हणा. ग्राहकांना नाही म्हणण्यामागचे कारण, तुमचा दृष्टिकोन समजावून सांगा.

एखादं काम तुम्ही स्वतः करून पाहिल्याशिवाय दुसऱ्या कोणाला देऊ नका. तुम्ही स्वतः काम केल्याने त्या कामाचे स्वरूप तुमच्या लक्षात येईल व ते काम दुसऱ्या कोणाकडून करून घ्यायचं की तुम्ही स्वतःच करायचं याचा अंदाज येईल. काम करणारी, उत्पादनक्षम माणसे नेमा.

तुमच्या कंपनीतला प्रत्येक जण वर्षातील काही दिवस तरी ग्राहकांशी जोडलेला असेल तर त्याला ग्राहकांच्या समस्या कळतात आणि त्या सोडवण्यासाठी ते प्रेरित होतात. समाधानी ग्राहकांचा आनंद आणि समस्या सोडवल्या नंतरच ग्राहकांचं समाधानही प्रेरणा देत.

कंपनी लहान असताना तुम्ही कामाची दिशा बदलू शकता. वेगवान निर्णय घेऊ शकता. तुमच्यासमोर नसलेल्या समस्येचे उत्तर शोधायला जाऊ नका नाहीतर पैसा आणि वेळ वाया जाईल. जास्त तास काम करण्याची नव्हे, तर चांगल्या प्रकारे काम करण्याची गरज असते.

सगळ्यांकडे कल्पना असतात आणि कल्पना कायमस्वरूपी असतात. प्रेरणा जास्त काळ टिकत नाही. तुम्हाला एखादी गोष्ट करण्याची प्रेरणा मिळाली तर ती गोष्ट लगेच करा. जेव्हा तुम्ही प्रेरित असता तेव्हा दोन आठवड्याच काम तुम्ही २४ तासात करून टाकता.

व्यवसायातील छोट्या गोष्टींचा विचार करून आपले विचार व दृष्टिकोन कसे बदलायला हवेत हे लेखकांनी उदाहरणे देऊन सांगितले आहे. काम करण्याच्या पद्धतीत छोटे बदल करून, विचार व दृष्टिकोन बदलून, तुम्ही व्यवसायात कसे यशस्वी होऊ शकता हे सांगणारे रिवर्क हे अतिशय वाचनीय पुस्तक आहे.

# शिक्षणाचा 'वसा आणि वारसा' जपणारी भारतीय शिक्षण प्रसारक संस्था

आधुनिक केसरी

**श्री खोलेश्वर ,सिद्धेश्वर ,केशवराज, संचारेश्वर, चिंतेश्वर ही ग्रामदैवते आणि स्वा. सावरकर ,आर्य चाणक्य, विक्रमादित्य, विवेकानंद,पण.पू. गोळवलकर गुरूजी,कै. केशव, दत्ताजी भाले, नाना पालकर यासारख्या राष्ट्र प्रथम हे ध्येय बाळगणाऱ्या देशभक्तांच्या नावे संपूर्ण मराठवाड्यात गेली सत्तर वर्षापासून भारतीय शिक्षणाचा वसा आणि वारसा जपणारी एक अग्रगण्य भारतीय शिक्षण प्रसारक संस्था आहे.**

तीन वरिष्ठ महाविद्यालय ,पाच कनिष्ठ महाविद्यालय, नऊ माध्यमिक 14 प्राथमिक विद्यालय, चार शिशुविहार ,पाच सीबीएसई स्कूल ,दोन वस्तीगृह ,दोन कौशल्य विकासन केंद्र, एक वाचनालय एवढ्या मोठ्या संख्येने चालणारे संस्कार केंद्रातून दरवर्षी हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

सण 1951साली सुरू झालेल्या या रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण नव्याने बदल होऊन येत आहे, ते म्हणजे संस्थेने राबवलेल्या शैक्षणिक उपक्रमांचे प्रतिबिंबच आहे. या धोरणाची पाठराखण आणि यशस्वीतेसाठी सर्वांगीण कार्यशाळा संस्थेने घेतलेल्या आहेत .संस्था अमृत महोत्सवाकडे वाटचाल करीत असताना आपले स्वायत्त विद्यापीठ असावे हा अनेकांचा मानस आता पुर्ततेकडे सरकत आहे.स्व. नानाजी देशमुख ग्रामीण कौशल्य विकास विद्यापीठ असा प्रस्ताव केंद्र शासनाकडे विचाराधीन असून या प्रकल्पामुळे आगामी काळातील संस्थेचे शैक्षणिक क्षेत्रातील प्रतिष्ठा वृद्धिंगत होऊन परिघअधिक मोठा होईल.

आज शिक्षणा समोर विविध आव्हाने उभी आहेत. भारतीय शिक्षण प्रसारक संस्था ही एक विशिष्ट ध्येयाने काम करीत आहे. संस्थेचे सर्वात मोठे ध्येय "माणूस घडविणे" आहे. माणूस घडविण्याची प्रक्रिया ही निरंतर चालणारी आहे, यात शिक्षणाचा सर्वाधिक वाटा आहे. विस्तार म्हणजे जीवन होय, आपण लहान असे बियाणे जमिनीत पेरतो, काही काळातच त्याचे विशाल वृक्षात रूपांतर होते. निसर्गाच्या नियमानुसार झालेली वृक्षाची वाढ त्या वृक्षाच्या सौंदर्यात भर घालतेच किंवा उत्तम प्रकारची फळे देण्यास समर्थ होईलच असे मात्र खात्रीने सांगता येणार नाही, आपल्याला जर वृक्षाची सर्वांगसुंदर वाढ व्हावी व त्यापासून उत्तम प्रकारची फळे मिळावीत अशी अपेक्षा असेल तर त्यासाठी सुरुवातीपासूनच प्रयत्न करावे लागतात. झाडाला नियमित खत-पाणी द्यावे लागेल, आसपासचे गवत कापावे लागेल हे सर्व परिश्रम घेतले तरच आपल्याला रसरशीत ,सुरेख व दर्जेदार फळे देणारा वृक्ष




मिळू शकेल. मनुष्य जीवनाचे ही असेच आहे जन्मताच कुणीही पूर्ण नसतो प्रयत्नाद्वारे पूर्णत्व प्राप्त करून द्यावे लागते .मुलांना बालपणापासून चांगले संस्कार द्यावे लागतात. सुरुवातीस आई वडील व शिक्षकांना ही जबाबदारी पार पाडावी लागते. समज आल्यानंतर मात्र स्वतःचा विकास करून घेतला पाहिजे व ही समज विद्यार्थ्यात रुजावी यासाठी सातत्याने संस्कार केले गेले पाहिजे. मनुष्य विचारशील प्राणी आहे, त्यामुळे स्वतःचा विकास करून घेण्याचे पूर्ण स्वातंत्र्य त्याला आहे. कर्तुत्वाने मानव प्रगती साधतो पण नुसते कर्तुत्व उपयोगाचे नाही तर त्याला चारित्र्य शक्तीची जोड असल्याशिवाय ते मोठेपण टिकून राहू शकत नाही. निष्कलंक चारित्र्य व्यक्तिमत्व विकासाचा मूलभूत पाया आहे ,अशा व्यक्तींची संख्या जरी कमी असली तरी ते जगाचे नेतृत्व करण्यास समर्थ असतात. आपल्या व्यक्तिमत्त्वात झटपट बदल घडून यावा अशी सर्वांची इच्छा असते, व्यक्तिमत्त्वातील बदल आणि विकास हे दोन समानार्थी शब्द नाहीत,बाह्य व अंतरंग ही व्यक्तिमत्त्वाचे दोन अंग आहेत, प्रगती त्यावर घडत असते पण "सामर्थ्य ओळखण्याची शक्ती म्हणजे शिक्षण होय" शरीर मन बुद्धी हृदय व चैतन्यशक्ती या सर्वांचा समतोल विकास म्हणजे व्यक्तिमत्त्वाचा विकास, हा विकास घडवण्यासाठी "शिक्षण" हा आत्मा आहे. मूल्यमापन ,अभ्यासक्रम व अभ्यासपूरक मंडळाची रचना वर्षभरात विद्यार्थ्यांच्या अंगभूत गुणांचा विकास करण्यासाठी विविध संस्कारक्षम कार्यक्रमाचे आयोजन सर्व संस्कर केंद्र करतात व ते राबवण्यासाठी शिक्षक पालक यांचा सुसंवाद म्हणजे संस्कार केंद्रातील उपक्रम असतात .अभ्यासपूरक मंडळांतर्गत बलोपासक,कलोपासक,ज्ञानोपासक संस्कार व विज्ञान, निसर्ग मंडळ कार्यक्रमाची रूपरेषा ठरवून संस्थेतील सर्वच केंद्रात त्याची अंमलबजावणी केली जाते. आज विद्यार्थ्यांची मानसिकता बदलत आहे, विद्यार्थी संवेदनशील झालेले आहेत व त्यांचे ऐकून घेण्याची मानसिकता कमी होत चाललेली आहे. मुलांना चुकांबद्दल रागावले, खडसावले तर मन खिन्न होते, परीक्षेत कमी गुण मिळाले की तनाव येतो, त्यामुळे आत्मविश्वास कमी होतो. शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांतील आत्मिक शक्तीला अधिक चेतना देण्यासाठी शिक्षक -पालक संवाद, शिक्षक-विद्यार्थी संवाद ,विद्यार्थी कार्यशाळा विविध उपक्रम घेत, उत्तम विद्यार्थी, उत्तम माणूस घडावा यासाठी संस्था कार्यरत आहे यासाठीच या शैक्षणिक वर्षात सर्वांना शुभेच्छा देत, मनःपूर्वक स्वागत करुयात...

प्रमोद कुलकर्णी
मो. 9403904651

# आकाश यशाचे.. प्रांगण सावरकर संकुलाचे...

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत असतानाच भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेची यशस्वी वाटचाल त्याच मार्गावर असून स्वातंत्र्यानंतर शैक्षणिक धोरणात होत असलेला मोठा बदलात सर्वात अग्रेसर असलेली मराठवाड्यातील संस्था "राष्ट्रहित प्रथम" हे धोरण घेऊन चालते आहे.

मराठवाड्यातील गुणवत्ता आणि भौगोलिक दृष्ट्या ही सर्वात मोठे शैक्षणिक जाळे संस्थेचे आहे, याच संस्थेचे बीड येथील स्वा सावरकर शैक्षणिक संकुल म्हणजे आकाश यशाचे... प्रांगण सावरकर संकुलाचे.... या वाक्याची प्रचिती देणारे,' केजी टू पीजी 'म्हणजेच बालवाडी ते पदवीपर्यंत शिक्षण आणि संस्काराचे प्रांगण ठरले आहे.

कोरोना च्या काळात मागील दोन वर्षात शैक्षणिक वातावरण अस्थिर झालेले असताना ऑनलाईन शिक्षणासाठी केलेले संस्थेने आणि सर्व शाळा महाविद्यालयात "तंत्रस्नेही प्रशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण" मोठे यशस्वी केलेले आहे. महाविद्यालयातील विद्यार्थी ऑनलाइन शिक्षण घेऊ शकतात पण बालवाडीतील मुले-मुली देखील पालकांच्या मदतीने ऑनलाइन अभ्यासक्रम करून शिक्षणाशी जोडले गेले होते,हे विशेष.

सावरकर शैक्षणिक संकुल म्हणजे एक परिवार आहे, विद्यार्थी हा केंद्रबिंदू, शिक्षक-पालक याला पूरक आणि पोषक पाठबळ देणारी संस्था ही चौकट सक्षम पणे हा परिवार जोपासते. ऑनलाईन शिक्षण, संगणक शिक्षण, स्पर्धा परीक्षा, शिष्यवृत्ती, नवोदय, ओलंपियाड या सोबत संस्थेने एमटीएस,बीटिएस परीक्षा साठी विशेष वर्गाचे आयोजन करून गुणवत्ता विकासाकडे प्रामुख्याने उपक्रम योजले जातात. बाल वाचणालय ते सुसज्ज ग्रंथालय चालवणे शैक्षणिक एक वैशिष्ट्य आहे.

गुणवत्तापूर्ण विद्यार्थी वाटचाल असताना शारीरिक व मानसिक आरोग्य संवर्धनासाठी खेळ,कवायत, प्राणायाम,सूर्यनमस्कार याचेही विशेष वर्ग घेतले जातात. 21 जून हा जागतिक योग दिन साजरा करण्याचे धोरण जरी सात वर्षापासून चे असले तरी व्यायाम योगा ,सूर्यनमस्कार याचे शिक्षण संस्थेत अनेक वर्षा पूर्वीच ,अभ्यास पूरक मंडळामार्फत घेतले जात होते. बलोपासक,कलोपासक,ज्ञानोपासक मंडळे ही वैशिष्ट्यपूर्ण रचना संस्कार केंद्रात अनेक वर्षापासून सुरु आहे. विद्यार्थ्यांतील नेतृत्व गुण विकसित करणे व सक्षम देशभक्त नागरिक होण्यासाठी जवाबदारीची जाणीव करून दिली जाते.

माजी विद्यार्थी आवर्जून आपले पाल्य संस्थेच्या संस्कार केंद्रात शिक्षणासाठी पाठवतात, आग्रही असतात. शिक्षकांनी सुरू केलेली शैक्षणिक संस्था, "राष्ट्रहित प्रथम" घेऊन चालते इतर शैक्षणिक संस्था, संस्थाचालक आणि शिक्षण यापेक्षा कितीतरी वेगळे आणि चांगले धोरण या आपल्या भाशिप्र चे आहे, हा समाज मनातठसा उमटण्यामागे येथील शिक्षकांचे, शिक्षणप्रेमी संस्थाचालकांचे कार्य आहे." उत्तम माणूस" गुणवंत विद्यार्थी" घडवण्यासाठी धडपड विविध उपक्रमातून होते, या मुळेच पालकांचा ओढा संस्थेच्या संस्कार केंद्राकडे




असतो . बीड शहरातील स्वा सावरकर शैक्षणिक संकुलाकडे ही आहे धोरणाप्रमाणे चालताना प्रवेश मर्यादा ओलांडता येत नाही, त्यामुळे रोष उत्पन्न होण्याआधीच प्रवेश निश्चित करताना होणारी कसरत मोठी असते, हे करत असताना कोणतेही निकष न लावता, "आहे तसा घ्यायचा आणि योग्य तसा घडवायचा" यासाठी सावरकर शैक्षणिक संकुल अग्रेसर आहे.

आज 28 जून संस्थेचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा होतो आहे, ते गुणवंतांच्या कौतुक सोहळ्याने. जो आत्मा, जो केंद्रबिंदू समोर ठेवून शिक्षण सेवा सुरू आहे, तो यशस्वीपणे साकार होत असलेला हा गुणगौरव सोहळा .संकुल, संस्था आणि समाजमनासाठी प्रेरक आणि समाधान व्यक्त करणारा आहे.

एक शिक्षण सेवक कार्यकर्ता म्हणून मला याचा मोठा आनंद आहे, तो आज प्रगट करत तमाम शिक्षणप्रेमी, मुख्याध्यापक, प्राचार्य,शिक्षक, शिक्षण सेवक, पालक सहकारी सर्वांना शुभेच्छा देत, गुणवंतांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो आहे.

# ई-पॉस मशीनच्या खराबीमुळे रेशन दुकानात धान्य असून नागरिक उपाशी

आधुनिक केसरी न्यूज

**बहादुर चव्हाण**

**देव्हारी :** राशन धान्य वितरण व्यवस्थेत वापरण्यात येत असलेल्या ई-पॉस मशीनमध्ये तांत्रिक अडचणी येत असल्यामुळे शिधावाटप दुकानात धान्य असूनही ते मिळत नसल्याचे समोर आले आहे. रोजंदारीवर जाणाऱ्या नागरिकांना कामाचे खाडे करून गेली तीन ते चार दिवसांपासून संपूर्ण दिवस रेशन दुकानासमोर घालवावा लागत असल्याने सोयगाव तालुक्यातील नागरिक चांगलेच वैतागलेले पाहायला मिळाले. प्रसंगी नागरिक धान्य दुकानदार यांच्यावर ताशेरे ओढून शिवीगाळ करू लागले आहेत. यामुळे धान्य दुकानांदाराना परिस्थिती हाताळणे कठीण झाले आहे.

ई-पॉस मशीनमध्ये तांत्रिक अडचणी येऊ लागल्याने वैतागलेल्या सोयगाव तालुक्यातील देव्हारी गावातील नागरिकांनी रेशन दुकानासमोरच मशीन पद्दत बंद करण्याचे नारे देऊन शासनाच्या ढिसाळ कारभारा विरोधात आवाज उठवला आहे. स्वस्त धान्य दुकानामार्फत होणाऱ्या रेशन धान्य वितरण व्यवस्थेत पारदर्शकता यावी या हेतूने राज्यभरात ई-पॉस या बायोमेट्रिक प्रणालीचा वापर सुरू झाला आहे. परंतु ई-पॉस मशीनचे सर्व्हर वारंवार डाऊन होत आहे. तसेच स्लो नेटवर्कमुळे लिंक फेल होऊन रेशन वितरणात अडचणी येत आहेत. परिणामी लाभार्थ्यांसह स्वस्त धान्य दुकानदारही त्रस्त झाले आहेत.



गेल्या तीन चार महिन्यांपासून सातत्याने ई-पॉस मशीनचा सर्वर डाऊन झाल्यामुळे राशन वितरणाचे काम अत्यल्प वेळ चालत आहे. एका दुकानदाराला दिवसभरात एक ते दोन ग्राहक करण्यासाठी एक ते दीड तासाचा वेळ लागत आहे. परिणामी दुकानासमोर लाभार्थ्यांची गर्दी होत असते. अनेकदा उद्‌भवणाऱ्या तांत्रिक दोषामुळे लाभार्थ्यांना धान्य वितरणात अडचणी येत असून बऱ्याच ठिकाणी राशन दुकानदार व लाभार्थ्यांमध्ये किरकोळ वाद होत आहेत. गरीब कुटुंबांना पुरेसे अन्न मिळावे, त्यांची उपासमार होऊ नये यासाठी शासनाने अशा गरीब व सर्वसामान्य कुटुंबासाठी स्वस्त दरात राशन उपलब्ध करून देण्याची योजना अंमलात आणली. गरीब कुटुंबांना स्वस्त दरात धान्य उपलब्ध करून दिले जाते.

सातत्याने जिल्ह्यातील सर्वच दुकानांमध्ये हा सावळागोंधळ सुरू आहे. रोजंदारीवर कामाला जाणारे कार्डधारक सकाळी सात वाजल्यापासून दुकानांसमोर ताटकळत उभे असतात. दुकानात धान्य साठा शिल्लक असूनसुद्धा मशीनवर धान्य उपलब्ध होत नसल्यामुळे धान्य देता येत नाही. यामुळे दुर्बल घटकांतील लाभार्थ्यांवर उपाशी राहण्याची वेळ आली आहे. या प्रकारामुळे अनेक लाभार्थी हवालदिल झाले आहेत.

ई-पॉस मशीन सुरू केल्यानंतर त्यात ग्राहक क्रमांक म्हणजेच 'आरसी नंबर' टाकले जाते. यानंतर मशीनमध्ये संबंधित कार्डधारकाला किती धान्य मिळणार हे स्पष्ट होते. या प्रक्रियेनंतर मशीन रक्कम दाखविते; परंतु सध्या ई-पॉसमशीन ही रक्कम दाखवीत नाही. सात ते आठ वेळा प्रयत्न केल्यानंतर रक्कम दर्शवीत नाही. त्यामुळे धान्य वाटप करणे शक्य नाही.

यामुळे दुकानदारांच्या अडचणी वाढल्या आहेत. या प्रकारामुळे महिन्याच्या अखेरीस धान्य घेण्यासाठी येणाऱ्या अनेक शिधापत्रिका धारकांना धान्य न घेताच परत जावे लागत आहे. ई-पॉस मशीन अनेक दिवसांपासून सक्षमपणे कार्य करीत नसल्यामुळे जानेवारी, फेब्रुवारी-२०२२ चे नियमित आणि प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेचे नियमित आणि मागील धान्य वितरण करण्यात अडचणी आहेत. सतत येणाऱ्या तांत्रिक समस्यामुळे धान्याचे ऑनलाईन वितरण होत नाही. यामुळे गेली तीन ते चार दिवस नागरिक कामाचा खडा करून रेशनिंग दुकानात धान्यासाठी उभे राहत असल्याने दोन्ही बाजूने उपाशी मरण्याची वेळी आली आहे.

## कोरड्या विहिरीत पडलेल्या उदमांजराला मिळाले जीवदान

आधुनिक केसरी न्यूज

**आष्टी :** वन्यजीवांमध्ये काही पशु-पक्षी दुर्मिळ असतात. अशाच प्राण्यांमध्ये उदमांजराचाही समावेश आहे. एक उदमांजर कोरड्या विहीरित पडल्याचे समजताच कड़ा येथील प्राणीमित्र नितिन आळकुटे यांनी कोरड्या विहीरित उतरून उदमांजरास सुरक्षितपणे बाहेर काढुन निसर्ग सानिध्यात सोडुन दिले.

आष्टी तालुक्यातील धिर्डी गावातील  बबन पाचपुते यांच्या कोरड्या विहिरीत एक उदमांजर पडलेले त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी याबाबत वनविभागाला आणि प्राणीमित्र नितीन आळकुटे यांना कळवले. आपल्या सहकारी मित्रांसह आळकुटे त्याठिकाणी गेले व चाळीस फुट खोल असलेल्या कोरड्या विहीरीत दोरीच्या सहाय्याने उतरून उदमांजरास पकडून सुखरूप बाहेर काढण्यात आले व निसर्गात सोडुन देणारा आले. यावेळी मदतीसाठी गणेश पवळ, शैलेश मिश्रा, अक्षय भंडारी, सागर शिंदे, राजु भोजने, प्रबोध व वनविभागाचे कर्मचारी युनुस शेख, अशोक काळे, महेश मोरे यासह सरपंच विकास करडुळे व इतर ग्रामस्थांनी सहकार्य केले.





## माळीवाडा येथे वाकीच्या दिंडीचे भव्य स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**दौलताबाद :** गेल्या दोन वर्षांपासून करोनामुळे पंढरपूरच्या विठुरायाच्या चरणी दर्शनासाठी वारकऱ्यांना जाता येत नव्हते. परंतु यंदाच्या वर्षी प्रशासनाने पायी वारीला परवानगी दिली आणि वारकऱ्यांची दिंडी पंढरपुरच्या दिशेनी वळली. महाराष्ट्रभरातुन शेकडो दिड्या पंढरपूराकडे निघाल्या. त्या दिड्यांचे गावोगावी मुकामाची जेवणाची व्यवस्था दिंडी मार्गारावर केली जाते. त्यातील श्री क्षेत्र वाकी (देवीची) येथील नारायण देव बाबा यांची पायी दिंडीचे २२ वे वर्ष असून दरवर्षी प्रमाणे माळीवाडा येथे चंद्रकात हेकडे व परिवार हे २२ वर्षापासुन या दिंडीचे स्वागत, वारकऱ्यांची भोजन व्यवस्था करतात.

यावेळी दिंडी असलेल्या आश्वाचे पुजन, रथ पुजन दिंडी चालक शिवेश्वर देवस्थानचे उत्तराधिकारी ह.प.भ. नामदेव महाराज व ह.भ.प विजय कुमार महाराज यांचे प्रवचन झाले. त्याचा यावेळी सत्कार करण्यात आला. प्रवचनानंतर वारकऱ्यांनी महाप्रसाद घेत पुढील प्रवासाला निघाले. यावेळी चंद्रकांत हेकडे, राजु हेकडे, संजय पुंड, भावराव महाराज, सुधाकर हेकडे, कडु किर्तीकर, बाळु हेकडे, प्रमोद साठी, संदिप कोथमबीरे, आसाराम हेकडे, माळीवाडा सरपंच आनिता हेकडे, आनिता देवतकर, नंदाबाई देवतकर, वैजिनाथ हेकडे, बाळु काबळे, नंदकुमार जाधव, शिवाजी मोरे, कारभारी जाधव, रामचंद्र बडेकर, रामराव मुळे यासह परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निसर्ग मित्र समितीला राजर्षी शाहू महाराज जयंती निमित्ताने पुतळा भेट

आधुनिक केसरी न्यूज




**धुळे :** महाराष्ट्र शासन छत्रपती शिवाजी महाराज राज्यस्तरीय वनश्री पुरस्कार प्राप्त निसर्गमित्र समितीच्या वलवाडी स्थित कार्यालयात राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे पनतू माजी आमदार जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन राजवर्धन कदमबांडे यांच्या अध्यक्षतेखाली सामाजिक न्याय दिन व आरक्षणाचे जनक राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना जयंतीनिमित्त मान्यवरांच्या हस्ते पुतळाचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून जेष्ट सामाजिक कार्यकर्ते डॉ. दरबारसिंह गिरासे, मराठा सेवा संघाचे अध्यक्ष संदीप पाटील, निसर्ग मित्र समितीचे संस्थापक प्रेमकुमार अहिरे, जिल्हाध्यक्ष डी.बी.पाटील, प्रदेश संघटक प्रभाकर सूर्यवंशी, संघटक आत्माराम सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी  प्रथम मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शाहू महाराज यांच्या पुतळाचे पूजन करण्यात आले. तर सामाजिक कार्यकर्ते तथा कृषी अधिकारी अरूण तायडे यांनी २५,००० रू. किमतीचा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा आकर्षक पुतळा राजर्षी शाहू महाराज यांचे वंशज पनतु राजवर्धन कदमबांडे यांच्या हस्ते निसर्ग मित्र समितीच्या कार्यालयास भेट देण्यात आला. या प्रसंगी डॉ दरबारसिंह गिरासे, मराठा सेवा संघाचे अध्यक्ष संदीप पाटील, सामाजिक कार्यकर्ते अरूण तायडे यांनी छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याची माहीती दिली.

अध्यक्षीय भाषणात माजी आमदार राजवर्धन कदमबांडे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज खरे पर्यावरण प्रेमी व वृक्ष मित्र होते. साडेतीनशे वर्षापूर्वी आद्न्यापत्र देऊन वृक्ष संवर्धनाचा जनतेला आदेश  देणारे छत्रपती शिवाजी महाराज पर्यावरणाचे उपासक होते, तरी आपण त्यांचा आदर्श घ्यावा, असे आवाहन केले. तसेच मी निसर्ग मित्र समितीचा १५ वर्षापासूनचा कार्यकर्ता असून निसर्ग मित्र समितीचे कार्य कौतुकास्पद आहे, असे अध्यक्ष भाषणात म्हणाले.

सदर कार्यक्रमास जिल्हा उपाध्यक्ष प्राचार्य आर.ए. पाटील, अहिराणी साहित्यिक बोरसे, आदर्श शिक्षक व्ही.टी. गवळे, प्रभाकर पवार, राजेंद्र ढोडरे, किशोर अहिरे, मनोज देवरे, वैभव पाटील आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी धुळे जिल्हा सचिव विश्वास पगार, धुळे जिल्हा संपर्क प्रमुख शाहीर विजय वाघ, तालुका अध्यक्ष मनोज पाटील, धुळे शहराध्यक्ष प्रा.एच.ए. पाटील, शिंदखेडा तालुका अध्यक्ष आर.आर. सोनवणे, मालेगाव तालुका अध्यक्ष प्रा. दिपक देशमुख, धुळे शहर कार्याध्यक्ष प्रा.डॉ.प्रविण नेरपगार, धुळे शहर सहसचिव शिवाजी बैसाणे, धुळे तालुका संघटक ईश्वर बैसाणे, सामाजिक कार्यकर्ते सुरेश बैसाणे, धुळे शहर प्रसिद्ध प्रमुख हर्षल महाजन आदींनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचालन राज्य महासचिव संतोषराव आबा पाटील तर व आभार प्रदर्शन शिंदखेडा तालुका अध्यक्ष आर.आर. सोनवणे यांनी केले.

होल्डिंग हॅन्ड्स
बहुउद्देशिय संस्था, औरंगाबाद
समाजाच्या हितासाठी एकमेकांचा हात धरून मानवी साखळी बनवूया.
संस्थेचे उद्देश
माणसे जोडणे | आरोग्य | शिक्षण | पर्यावरण | सांस्कृतिक
महिला लघु उद्योग आणि रोजगार | सामाजिक बांधिलकी असलेले सर्व उपक्रम



सुरेश सिरसीकर
संस्थापक/ अध्यक्ष



रविंद्र बनकर
उपाध्यक्ष



अपर्णा मेहता
सचिव

अधिक माहितीसाठी : 7020577693 | holdinghands092@gmail.com

# होल्डिंग हँड्सचे इको टास्कच्या सहयोगाने जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** नागरिकांनी जास्तीत जास्त प्रमाणात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनासाठी योगदान करावे तसेच आपला परिसर हरित, ऑक्सीजनमय करावा, प्रत्येकाने एकतरी झाड दत्तक घेऊन त्याचे पोषण करावे, जेणेकरून भावी पिढी निरामय पद्धतीने जगू शकेल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यांनी केले. होल्डिंग हँड्स बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने गोगाबाबा टेकडी (डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ) येथे आयोजित वृक्षारोपण कार्यक्रम प्रसंगी चव्हाण यांनी उपस्थित पर्यावरणप्रेमी शहरवासीयांना तुम्ही आज लावलेले रोपटे भविष्यात मानव, पशु, पक्षी, किटक आदी सजिवांना संजिवनी देणारे ठरेल, असे सांगितले. तसेच कर्नल एम.ए.खान यांनी विद्यापीठातील गोगाबाबा टेकडीवर विविध प्रकारच्या झाडांची लागवड केली जात असल्याने ऑक्सीजन हब निर्मितीसाठी मदत होत असल्याचे सांगत संस्थेची विशेष प्रशंसा केली.




याप्रसंगी ईको टास्क फोर्स मराठवाडाचे कर्नल एम.ए.खान, इको टास्क फोर्स मराठवाडाचे कैपटन हित मेहता, होल्डिंग हँड्स बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश सिरसीकर, उपाध्यक्ष रवींद्र बनकर, सचिव अपर्णा मेहता, मधुकरअण्णा वैद्य, जिल्हाध्यक्षा वर्षा जैन, औरंगाबाद पर्यावरण विभाग प्रमुख सुष्मिता डोंगरे, राजेश फत्तेलष्कर यांची प्रमुख उपस्थिती होती. तर किरण वनगुजर, मंगला महाजन, सुरेखा कलबुर्गे, उमेश डोंगरे, प्राची सिरसीकर, प्रमिला कुलकर्णी, भगवान वाघ, प्रतिभा शर्मा, सुवर्णा वनगुजर, अविनाश वाघमारे, महेश सिरसीकर, महेंद्र डेंगळे, अजय जोशी, बळीराम पवार, प्रणव बोरीकर, ज्येष्ठ पत्रकार सतीश अन्वेकर आदी सदस्य उपस्थित होते. प्रास्ताविक उपाध्यक्ष रवींद्र बनकर तर सूत्रसंचालन सुरेखा कलबुर्गे यांनी केले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश सिरसीकर यांनी औरंगाबादसह होल्डिंग हँड्स बहुउद्देशीय संस्थेच्या राज्यभरात शाखा असून पंजाब, गोवा व कर्नाटकातही पर्यावरण संरक्षण, संवर्धन, व्यापक प्रमाणात शाखा आहेत. होल्डिंग हँड्स बहुउद्देशीय संस्था आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, वृक्षारोपण, सांस्कृतिक आणि सामाजिक बांधिलकी असलेले अनेक उपक्रम राबवित असल्याचे सांगितले.

यावेळी व्यासपीठावर उपस्थित मान्यवरांचे संस्थेचे स्मृती चिन्ह, रोपटे देऊन स्वागत करण्यात आले. तसेच टीशर्ट अनावरण आणि वाटप करण्यात आले. जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यांच्या हस्ते संस्थेसाठी उत्कृष्ट योगदान केल्याबद्दल राज्य पर्यावरण प्रमुख मंगला महाजन, अपर्णा मेहता, राजेश फत्तेलष्कर, सस्मिता डोंगरे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमानंतर उपस्थित नागरिकांनी विविध प्रकारच्या झाडांचे वृक्षारोपण केले.

# शिवसेनेचे महानगरप्रमुख सतीश महाले यांचा राजीनामा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** नुकताच राजकीय पक्षाचे व शिवसेनेचे आमदारांनी केलेले बंडखोरीचे प्रकरण गाजत आहे. परंतु यांच्या बंडखोरीमुळे त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये व पदाधिकाऱ्यांमध्ये दुहेरी वातावरण निर्माण झाले आहे. त्यात कोणी शिंदेचा समर्थन करत आहे तर कोणी उद्धव ठाकरें त्यांचे सध्याच्या राज्यातील चालेल्या राजकीय घडामोडींना अनुसरून नमुद करून सतीश तात्या महाले यांना मागील काळात वेळोवेळी आलेल्या राजकीय व सामाजीक अडचणींमध्ये व संकटवेळी एकनाथ शिंदे हे त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहीले तेव्हापासून मी सतत त्यांच्या संपर्कात होतो, असे वक्तव्य राजीनामामध्ये नमूद केले आहे. म्हणून सद्य परिस्थितीत एकनाथ शिंदे यांनी घेतलेल्या निर्णयास पाठींबा देऊन मी शिंदे यांच्या सोबत जाण्याचा निर्णय घेत आहे व मी माझ्या सद्विवेक बुद्धीला जागुन माझा महानगरप्रमुख पदाचा राजीनामा देत असे म्हटले आहे व त्यांच्या वाहनावरील महानगरप्रमुख पदाची पाटी देखील काढण्यात आली आहे. महानगर प्रमुख पदाचा राजीनामा हा महेश मिस्तरी यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.



# पत्नीच्या निधनानंतर पतीनेही सोडले प्राण

आधुनिक केसरी न्यूज

**आडूळ :** पती-पत्नीचे अतुट नाते म्हणजे संसाराची दोन चाके, आयुष्यभर एकमेकांवर जिवापाड प्रेम करणाऱ्या पती-पत्नीच्या प्रेमाची तुलना करता येत नाही. पोटाला चिमटा देऊन काबाडकष्ट करून पोट भरणारे पती पत्नी मरेपर्यंत एकमेकांची साथ सोडत नाही अशा अनेक घटना आपण पाहतो परंतु अशीच एक अत्यंत हृदयद्रावक घटना पैठण तालुक्यातील ब्राम्हणगाव येथे रविवारी घडली. आपल्या पत्नीच्या पार्थिवावर अंत्यसंस्काराची तयारी सुरू असतानाच पतीला याचा विरह सहन न झाल्याने पत्नी पाठोपाठ पतीनेही आपले प्राण सोडून जगाचा निरोप घेतला. या घटनेनंतर गावात शोककळा पसरली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, ब्राम्हणगाव येथील जिजाबाई बिसनराव ढाकणे (वय ७४) ही वृद्ध महिला आज पहाटे झोपेतून उठल्यानंतर सकाळी ७:३० वाजेच्या सुमारास त्यांना अचानक हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांचे निधन झाले. जिजाबाई ढाकणे यांच्या पार्थिवावर अंत्यविधीची तयारी सुरू असतानाच मृत्यूचे दुःख सहन न झाल्याने त्यांचे पती बिसनराव



दगडु ढाकणे (वय ७८) यांनीही अवघ्या ४ तासाच्या अवधीमध्ये आपला प्राण सोडला. त्यामुळे अंत्यविधीला जमलेले नातेवाईक व ग्रामस्थांना मयत पत्नीच्या पाठोपाठ पतीच्या पार्थिवावर देखील अंत्यविधी करण्याची वेळ ओढावल्याने या हृदयद्रावक घटनेने परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

या घटनेने ढाकणे कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून वृद्ध पती-पत्नीच्या पार्थिवावर ब्राम्हणगावातील स्मशानभूमीत रविवारी सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. मयत पती-पत्नीच्या प्रेताला सोबतच एकाच दिवशी अग्निडाग देण्यात आल्याने उपस्थित ग्रामस्थ व नातेवाईकांच्या डोळ्यातून अश्रूंचा मोठा बांध फुटला होता. मयत पती-पत्नीच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे, जावई असा मोठा परिवार आहे.

# मोटारसायकल चोरी करणाऱ्या चोरट्याला ठोकल्या बेड्या

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** मोटरसायकल चोरी करणाऱ्या आरोपींचा शोध घेत धुळे तालुका पोलिसांनी मोटर सायकल चोरी करणाऱ्यांना जेरबंद केले असून त्यांच्याकडून चोरी केलेल्या एकूण 10 मोटरसायकली जप्त केल्या आहेत.दि. 23 एप्रिल 2022 रोजी बोरकुंड शिवारातून अज्ञात व्यक्तीने मोटरसायकल चोरी केली असल्याची फिर्याद धुळे तालुका पोलीस स्टेशन येथे दाखल करण्यात आली होती.

सदरचा गुन्हा हा योगेश शिवाजी दाभाडे रा.बळसाणे ता.साक्री याने केला असल्याची गोपनीय माहिती पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे यांना मिळाली. त्यावरून धुळे तालुका पोलीस स्टेशनचे शोध पथकाचे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी संशयीताचा शोध घेतला असता सदरचा संशयीत आरोपी हा वारंवार राहण्याची ठिकाणे व मोबाईल नंबर बदलत असल्यामुळे कौशल्याने त्याची माहिती काढून त्यास नाशिक येथून ताब्यात घेण्यात आले, तसेच त्याचा साथीदार अंकुश एकनाथ शिरसाठ रा.खडकी ता. चाळीसगांव यास देखील ताब्यात घेण्यात आले. सदर गुन्ह्याचे तपासातच आरोपीकडे विचारपुस करता त्यांनी एकूण ९ मोटार सायकलींची चोरीची कबुली देवून त्या मोटारसायकली पोलीसांनी हस्तगत केलेल्या आहेत. तसेच धुळे तालुका पोलीस स्टेशन येथील गुन्ह्यातील आरोपी विजय साईनाथ चव्हाण याचेकडून १ चोरीची मोटार सायकल हस्तगत करण्यात आलेली आहे. अशा एकूण 10 चोरीच्या मोटार सायकली धुळे तालुका पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी यांनी हस्तगत केलेल्या आहेत.

सदरची कारवाई विशेष पोलीस महानिरीक्षक शबी जी. शेखर, पोलीस अधीक्षक प्रविणकुमार पाटील, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत बच्छाव, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप मैराळे, पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली धुळे तालुका पोलीस स्टेशन येथील पोलीस उप निरीक्षक सागर काळे, सुनिल विंचुरकर, प्रविण पाटील, अविनाश गहीवड, धिरज सांगळे, कुणाल शिंगाणे, नितीन दिवसे, कांतीलाल शिरसाठ, राकेश मोरे, प्रमोद पाटील यांनी केली आहे.

# नॉर्मल डिलिव्हरीद्वारे पाच किलो वजनी अर्भकाचा जन्म

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** येथील प्रसिद्ध लैंगिक समस्यातज्ज्ञ डॉ. ए.एच. शेख यांची कन्या डॉ. फरजाना शेख यांनी खडकपुरा, नांदेड येथील त्यांच्या आयेशा हॉस्पिटलमध्ये आपले कौशल्य वापरून रेहाना बेगम शेख रिझवान या महिलेच्या गर्भाचे वजन जास्त असले तरी सिझेरियनशिवाय नॉर्मल डिलेव्हरी केली. यात बाळ व बाळाची आई दोघेही सुखरूप आहेत.

डॉ. फरजाना यांच्याकडे रेहाना बेगम ही महिला गर्भवती असताना नियमित तपासणीसाठी येत होती. गर्भातील बाळाची पूर्ण वाढ झाली होती. डिलिव्हरीच्या वेळेपेक्षा पंधरा दिवस



जास्त होऊनही डिलिव्हरी होत नसल्याने महिलेचे नातेवाईक काळजीत होते. इतरत्र तपासणी केल्यानंतर या सिझेरियन करण्याचा सल्ला देण्यात आला. मात्र, मात्र डॉ. फरजाना शेख यांनी नातेवाइकांच्या संमतीने आपले कौशल्य वापरून पाच किलो वजनी बाळ असलेल्या रेहाना बेगम यांची नॉर्मल डिलिव्हरी केली. डॉ. फरजाना शेख या परिसरांत नॉर्मल व सुलभ डिलिव्हरी करण्याठी प्रसिद्ध आहेत.

# धुळ्याहून मुंबई, पुणे जाणारी बोगी सुरू करा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** धुळ्याहून निघणारी मुंबई आणि पुणे बोगी रविवारी बंद करण्यात आली आहे. प्रवाशांच्या हितासाठी मुंबई - पुणेसाठी रेल्वे प्रशासनाने बोगी स्लिपर आणि सिटर सुरू करण्याची मागणी संविधान संरक्षण समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

धुळे शहरासह जिल्ह्यातून नागरिक मोठ्या प्रमाणावर मुंबई पुणे येथे शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी कामासाठी जा-ये करत असतात. यामुळे प्रवाशांना खाजगी बसने जावे लागते. खाजगी बस चालक प्रवाशांकडून तेराशे ते पंधराशे रूपये आकारले जातात. प्रवाशांच्या हितासाठी रविवारी मुंबई पुणे बोगी धुळ्याहून सुरू करण्यात यावी, अशी मागणी संविधान संरक्षण समितीचे हरीचंद्र लोढे, प्रभाकर खंडारे, एल.आर. राव, पोपटराव चौधरी, एस.यु. तायडे, दिपकुमार साळवे, महेंद्र महाले यांनी केली आहे.

# टिळकनगर येथे श्री बालाजी मूर्ती प्राणप्रतिष्ठापना वार्षिक उत्सव उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** श्री व्यंकट रमणा बालाजी मंदिर टिळकनगर येथे श्री बालाजी मुर्ती प्राणप्रतिष्ठापना वार्षिक सोहळा, उत्सव दि. 20 ते 26 जून या कालावधीत सलग सात दिवस मुर्तीस पावन अभिषेकासह भजन, किर्तन, प्रवचन आणि भक्तीसंगीत अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सर्वच कार्यक्रम सामाजिक प्रबोधनासह सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारे होते, या सर्व कार्यक्रमाला भाविकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली. या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी मंदिरप्रशासन परिसरातील सर्व भक्तांनी सहकार्य केले.

या बालाजी मुर्ती प्रतिष्ठापना सोहळा, उत्सवादरम्यान श्री बालाजी संस्थानतर्फे जे कार्यक्रम राबविण्यात आले त्यांची अतिशय सुंदर अशी काव्यमय शब्दांची गुंफण संगिता प्रदिप महाडिक यांनी केली आहे.

भल्या पहाटे पयोधतीघुत दुग्ध शर्कराने मुर्तीस पवममान अभिषेक झाला. महती वदली विष्णू सहस्त्रनामाची सलगरकरांनी पूर्ती केली. भक्तांनी विष्णू सहस्त्रनामाचे सामुहिक



पाठ करुन थोर नामाचा महिमा दिक्षितांनी कथन केला. आपुलकीची नाती हीच खरी श्रीमंती याची कडेठाणकरांनी जाणीव करून दिली. मनिषाताईंच्या भक्ती गीतांनी आनंदाचे डोई आनंदात तरंगली भक्त मंडळी रंगली. प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी यांनी ज्ञानदेवे रचिला पाया तुका झालासे कळस, देवाचिये द्वारी उभा क्षण भरी तेणे मुक्ती चारी साधियेल्या ईश्वराच्या जवळ जाण्याचा भक्ती मार्गच असे सोपा असे कथन करूनी विश्वमांगल्याच्या पसायदानाचे विवेचन केले.

सुंदर भजनाच्या पर्वनीचा खाऊ होता तो रेणुकामाता अन स्नेहवर्धीनी मंडळाचा. रघुपती राघव राजारामाच्या गजरात व्यंकटरमणाचा दरबार भरला. देह जावो अथवा राहो सदा राम नाम मुखी राहो असा राम नामाचा महिमा रामदासस्वामींच्या चरित्रातून गणेश रामदासींनी कथन केला आणि सोहळ्याचे सर्वोच्च शिखर गाठत विजयकुमार फडांनी काल्याच्या किर्तनाने सोहळ्याचा समारोप झाला.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in




# छत्रपती शाहू महाराजांच्या समतेचा वारसा युवकांनीच चालवावा : मा.आ. कैलास पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** बहुजनांचा राजा श्रीमंत छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या समतेचा वारसा आजच्या काळात युवकांनीच चालवणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार कैलास पाटील गंगापूरकर यांनी मारुती साळवे यांनी आयोजित केलेल्या छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त काव्यवाचन स्पर्धेच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना केले. यावेळी विचारमंचावर अशोक थोरात, मयूर सोनवणे, ज्ञानदेव वायसळ, सोपान मिसाळ आदी राष्ट्रवादीचे पदाधिकारी उपस्थित होते.

पुढे बोलतांना कैलास पाटील म्हणाले की, काव्यास्पर्धा केवळ स्पर्धा न राहता खऱ्या अर्थाने छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा उजाळा हे युवकच देऊ शकतात. म्हणून या कार्यक्रमाचे महत्वाचे वैशिष्ट्ये हेच आहे की फुले, शाहू, आंबेडकरांचे विचार समाजामध्ये पेरण्याचे विचारच हे युवक, युवती करीत असल्याचे गौरव उद्‌गार ही त्यांनी याप्रसंगी केली.

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या जयंतीदिनी सुमारे २५ कवींनी सहभाग नोंदवला, छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक, समतावादी विचार, त्यांनी केलेल्या धोरणात्मक कार्याचा गुणगौरव कवितेतून युवक युवतींनी केला.

काव्यवाचन स्पर्धेत अक्षय गवळी (प्रथम), रामराव बागुल (द्वितीय), प्रतीक्षा जाधव (तृतीय) यांनी रोक पारितोषिके पटकावली, तर उत्तेजनार्थ अशोक बागुल, अनिल जाधव, संभाजी गायकवाड, विठ्ठल भालेराव यांना देण्यात आले.

या कार्यक्रमात काही सामाजिक कार्य करणाऱ्या समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांना छत्रपती राजर्षी शाहू महाराज सामाजिक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या मध्ये अशोक येरेकर, पत्रकार संघाचे डॉ. प्रभू गोरे, ॲड. सुहास जोशी, वारकरी संप्रदायाचे भूषण लतिफ शेख महाराज आदींना या प्रसंगी गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संयोजक मारुती साळवे यांनी केले, तर कार्यक्रमाचे आभार आशोक थोरात यांनी मांडले. या स्पर्धेचे परीक्षक प्रा. सुरेश चौथईवाले व डॉ. बाळासाहेब गायकवाड हे होते. या कार्यक्रमाला औरंगाबाद शहरासह बाहेरील जिल्ह्यातून कवी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कन्नड नगर पालिकेच्या मतदार यादीतून इच्छुक उमेदवारांचा पत्ता कट

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** नगर पालिकेच्या मतदार यादीतून आतापर्यत आठरा वर्ष पुर्ण झाले मग मतदार यादीत नाव येते व मतदार मोठ्या उत्सुकतेने मतदान करतात व आपल्या मनाप्रमाणे आवडत्या उमेदवारांना मतदान करतात. त्यालाच लोकशाही पद्धतीने मतदानाचा हक्क बजावला खऱ्या अर्थाने आनंद होतो. मात्र कन्नड शहरातील वार्ड क्रमांक एक येथील सिद्धार्थ निकाळजे व सुरेखा निकाळजे यांचा मतदार यादीतुन पत्ताच कट केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. सिध्दार्थ निकाळजे वार्ड क्रमांक एक मध्ये आत्तापर्यत मतदाराचा हक्क बजावत होते. मात्र नवीन यादीमध्ये त्यांचे नावच गायब झाल्याने हा विषय चव्हाट्यावर आला आहे व निकाळजे परीवार हे आत्ताचे नगर पालिकेसाठी इच्छुक उमेदवार आहे, असा प्रकार जर यांच्या सोबत होत आहे तर सामान्य नागरीकांचा काय विषय आहे.

या वेळी सुरेखा निकाळजे बोलताना म्हणाल्या, कन्नड नगर पालिकेचे निवडणुक अधिकारी व सर्वे करणारे बी.एल.ओ. यांनी माजी नगरसेवकाच्या घरात बसून माजी नगरसेवकाच्या मर्जीचे मतदारांची नावे आपल्या प्रभागात ठेवून घेतले व विरोधातले मतदान दुसरा प्रभागात टाकले असा आरोप निकाळजे यांनी केला आहे व जे निवडणूक लढण्यासाठी इच्छुक आहे त्यांचे तर नावच कन्नड शहराच्या मतदार यादीमधून काढुन दुसऱ्या वार्डामध्ये टाकून दिले. अश्या या कन्नड नगर पालिकेच्या भोंगळ कारभारावर मुख्य अधिकारी नंदकुमार भोंबे लक्ष देणार का? असा सवाल त्यांनी केला आहे.

### सदरील यादी प्रारुप यादी आहे



**मतदारांनी यादी चेक करावी व आपला आक्षेप नगरपरिषदेला नोंदवावा. आक्षेप आला की दुरूस्ती होवून अंतिम यादी तयार होईल.**

**नंदकुमार भोंबे, मुख्य अधिकारी**



# छत्रपती प्राथमिक माध्यमिक विद्यालयात शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची जयंती छत्रपती प्राथमिक माध्यमिक शाळेत उत्साहात साजरी करण्यात आली. राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेचे प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष सुभाष पाटील, प्रशालेच्या मुख्याध्यापिका निर्मला व्यवहारे, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक राजेंद्र चव्हाण, प्रशालेतील शिक्षक वृंद रामदास वाघमारे, आण्णा आंधळे, राजेश आंधळे, जितेंद्र शिंदे, उत्तम जाधव, लक्ष्मण पाटील उपस्थित होते.

यावेळी सुभाष पाटील यांनी आपल्या व्याख्यानातून शाहू महाराजांचे जीवन, कार्य, जातीभेदाविरुद्ध लढा, स्वातंत्र्य लढ्यातील योगदान व इतर कार्यावर प्रकाश टाकला.

प्रशालेच्या मुख्याध्यापिका निर्मला व्यवहारे व माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक राजेंद्र चव्हाण यांनी महापुरुषांचे समाज जीवनातील स्थान, राजर्षी शाहू महाराज यांचे समाजकारणातील योगदान व सद्य राजकीय स्थितीत महाराजांच्या विचारांची गरज विशद केली.

छत्रपती प्राथमिक माध्यमिक विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशालेतील सहशिक्षक रामदास वाघमारे यांनी केले तर आभार प्रदर्शन आण्णा आंधळे यांनी मानले.

# मिस्टर टायटल ऑफ महाराष्ट्र स्पर्धेत जय खरात यांची उंच भरारी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** नाशिक येथे फ्रीडम इव्हेंट मॅनेजमेंट तर्फे नुकत्याच पार पडलेल्या मिस्टर टायटल ऑफ महाराष्ट्र या स्पर्धेत प्रथम क्रमांक धुळ्यातील शरीरसौष्ठवपटू म्हणून नावलौकिक असलेले जय कुंदन खरात यांनी पटकाविला आहे. त्यामुळे धुळे जिल्ह्यातून सर्वत्र कौतुकाचा वर्षाव त्यांच्यावर होत आहे.

लोक जनशक्ती पार्टीचे धुळे जिल्हा महासचिव कुंदन खरात यांचे ते चिरंजीव असून जय हा अनेक सामाजिक कार्यात अग्रेसर असल्याचेही दिसून येत आहे. तसेच शरीरसौष्ठव स्पर्धेत त्यांनी पारितोषिक देखील मिळवली आहे. नाशिक येथील के.टी.एम.सी. कॉलेज येथे फ्रीडम इव्हेंट मॅनेजमेंट तर्फे आयोजित केलेल्या मिस्टर टायटल ऑफ महाराष्ट्र या स्पर्धेत प्रथम क्रमांक जय




खरात यांनी मिळून धुळे जिल्ह्याचे नाव लौकिक केले आहे. या स्पर्धेसाठी कानाकोपऱ्यातून अनेक स्पर्धक आले होते. त्यात जय खरात यांनी प्रथम क्रमांक पटकाविला आहे. यामुळे त्यांच्यावर सर्वत्र कौतुकाचा वर्षाव केला जात आहे.

# धुळ्यात शाहू महाराजांच्या पुतळ्यासाठी लोटांगण आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा धुळ्यात व्हावा, या मागणीकरिता सामाजिक कार्यकर्ते कृष्ण बेडसे यांनी धुळे महानगर पालिकेच्या आवारात लोटांगण आंदोलन करत मनपा प्रशासनाचा धिक्कार केला आहे. तसेच येत्या काही दिवसात पुतळ्या संदर्भात निर्णय न झाल्यास आत्मदहन करणार असल्याचा इशारा देखील बेडसे यांनी मनपा प्रशासनाला दिला आहे.

गेल्या 16 वर्षांपासून शहरातील सामाजिक कार्यकर्ते कृष्ण बेडसे हे छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीदिनी शाहू महाराजांचा पुतळा व्हावा या मागणी करिता आंदोलन करत आहे. त्याबाबतीत निवेदन, अमरण उपोषण देखील केले आहे. मात्र जिल्हा प्रशासनासह मनपा प्रशासन तसेच लोकप्रतिनिधीना निवेदन देऊनही मागणी पूर्ण होत नसल्याने संतप्त झालेल्या बेडसे यांनी कार्यकर्त्यांना सोबत घेत मनपाच्या प्रवेशद्वारावर छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून छत्रपती शाहू महाराजांचा विजय असो, छत्रपती शाहू महाराजांचा पुतळा झालाच पाहिजे अशा घोषणा देत मनपा प्रशासनाच्या विरोधात लोटांगण आंदोलन केले आहे. त्यांनी केलेल्या आंदोलनामुळे शहरात चर्चेचा विषय झाला असून मनपा प्रशासन याकडे किती गांभीर्याने लक्ष देते? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

याप्रसंगी छोटू मोरे, अशोक पाटील, अशोक पानपाटील यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुस्तके खरेदीची सुवर्णसंधी
आपल्या पुस्तकाच्या संग्रहात अमुल्य भर घाला
३ पुस्तकांचा संच मिळवा १०००/- रुपयांत
पुस्तकांवर 20% सूट
गणिताच्या मूलभूत संकल्पना
(१ली ते १०वी व सर्व परीक्षांसाठी उपयुक्त)
MRP ₹ 430/- Offer Price ₹ 345/-
पाने ५३४
गणिताच्या मूलभूत संकल्पना प्रश्नसंच
सर्व शालेय विद्यार्थी, शिष्यवृत्ती परिक्षार्थी व सर्व स्पर्धा परीक्षांना उपयुक्त
MRP ₹ 470/- Offer Price ₹ 375/-
पाने ५३४
श्रीमती छायाताई खेडकर
8888780568
उखाण्यातून गणित
मुलभूत संकल्पना व जनरल नॉलेज
MRP ₹ 360/- Offer Price ₹ 280/-
पाने ३६४
श्री. हरिभाऊ गिते सर
9422742712
गणेश बुक स्टॉल,
भगवानबाबा चौक, पाण्याच्या टाकिजवळ, बीड
मो. 8149196415
दत्तराज पार्क,
बायपासरोड, सावतानगर, गेवराई
मो. 8888780568/9422742712
माऊली अपार्टमेंट,
मंगलमुर्ती कॉलनी, रेणू हॉस्पिटल जवळ,
धाडेनगर, बार्शी रोड, बीड मो. 8793150910